cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१४८ | मंगळवार, दि.२३ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# मराठवाड्यात पावसाळी कहर !

## शेती पिकं गेली पाण्याखाली; शेतकरी हवालदिल, तातडीने मदतीची अपेक्षा

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**खरीप पिकांची काढणी तोंडावर आलेली असतानाच मागील तीन ते चार दिवसांपासून राज्यासह मराठवाड्यघात पावसाने कहर केला आहे. विविध जिल्ह्यात ढगफुटी सदृश्य पावाने होत्याचे नव्हते केले असून शेती पिकांचें मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या आहेत. मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये रविवारी अन सोमवारी रात्रभर पावसाने झोडपून काढले त्यामुळे ओढे, नदी भरून वाहत असून, शेतात पाणी शीरल्याने खरिप पिकांचे फार मोठे नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीने शेतकरी हवालदिल झाला असून, शासनाकडून तात्काळ मदतीची अपेक्षा व्यक्त होताना दिसत आहे.**

लातूर, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली नांदेड ▶▶ पान २ वर



### माजलगाव धरणाचे ११ दरवाजे उघडले

माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे धरणातून सिंदफणा नदीपात्रात पाण्याचा मोठा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. माजलगाव धरणाचे ११ वक्री दरवाजे उघडण्यात आले असून, सिंदफणा नदीपात्रात ६२ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग केला जात आहे. दरम्यान सिंदफणा नदी पात्रात पाण्याचा विसर्ग केला जात असल्याने नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### धाराशीव जिल्ह्यात पुरात १७ गायी दगावल्या

पुराच्या तडाख्यात बेलगाव पिंपळगाव (ता.भूम, जि.धाराशिव) येथील शेतकरी विश्वनाथ दातखिळे यांच्या १७ गायी मृत्यूमुखी पडल्या आहेत. तर १० गायी पुराच्या पाण्यात वाहून गेल्या आहेत. निसर्गाच्या लहरीपणाने दातखिळे यांचे ३५ लाख रुपयांचे नुकसान केले आहे. त्यामुळे दातखिळे यांनी प्रशासनाने पंचनामे करून तातडीने सरकारने मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. रविवारी मध्यरात्री बेलगाव पिंपळगाव परिसरात अतिवृष्टी झाली. त्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली. गोठ्यात जनावरे बांधलेली होती. परंतु पुराचा प्रवाह जोरदार असल्याने दातखिळे यांच्या गायी वाहून गेल्या. तर काही मृत्यूमुखी पडल्या. तसेच गोठ्यातील २० शेळ्या, १५० कोंबड्या, ट्रॅक्टर आणि शेणखताचे नुकसान झाले आहे.

### सिंदफणा नदीला पूर; शेतीचे मोठे नुकसान

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदी कोपली असून, नदीच्या पुरामुळे शिरूर, गेवराई आणि बीड तालुक्यांतील अनेक गावांत पाणी शिरले आहे. या पूरस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात खरिपाच्या पिकांचे नुकसान झाले आहे. रविवारी रात्री शिरूर, आष्टी तालुक्यात मुसळधार पाऊस झाल्याने सिंदफणा नदीला अचानक पूर आला. यामुळे नदीकाठच्या गावांतील शेतात पाणी शिरले आणि उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले. सोमवारी दिवसभर नदीच्या पाण्याची पातळी वाढतच असल्याचे निदर्शनास आले. प्रशासनाकडून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले असून, आपत्ती व्यवस्थापन पथक सतर्क आहे. काही गावांत सुरक्षित ठिकाणी स्थलांतराची तयारी सुरू असल्याची माहिती स्थानिक प्रशासनाने दिली.

### बार्शीत ढगफुटी, ४ नद्यांना पूर

बार्शी तालुक्यात ढगफुटी झाली असून भोगावती, नागझरी, नीलकंठा आणि चांदणी नद्यांना पूर आल्याने नदी काठच्या अनेक गावांत पाणी शिरले असून शेतकऱ्यांची उभी पीके पाण्यात गेली आहेत. वैराग, आगळगाव, मळेगाव, कांदलगाव, श्रीपत पिंपरी, दहिटणे, पिंपळवाडी, मांजरे देवगाव येथील शेतकऱ्यांच्या शेतात पावसाचे पाणी शिरल्याने बळीराजाचे मोठे नुकसान झाले आहे. बार्शी-तुळजापूर रस्त्यावरील ओढ्यांना पूर आल्याने वाहतूक बंद झाली आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी लोकप्रतिनीधीही पावसात बांधावर पोहोचले आहेत. खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी पाहणी करत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे म्हटले.

### “ अतिवृष्टीची मदत दिवाळीच्या आधी देणार - कृषिमंत्री

राज्यात २० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे सुरु असून शेतकऱ्यांना दिवाळीच्या आधीच मदत दिली जाईल तसेच ओला दुष्काळ जाहीर करण्याचाही सरकार विचार करत असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. अतिवृष्टीच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या एनडीआरएफ आणि राज्य सरकारच्या एसडीआरएफमधून मदत मिळते. केंद्र सरकार ७५ टक्के आणि राज्य सरकार २५ टक्के मदत देते.

## थोडक्यात...

### अतिवृष्टीचा शिंदे यांनी घेतला आढावा

मुंबई : मराठवाड्यातील काही जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री यांनी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांनी फोनवरून संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या नागरिकांना तातडीने मदत करून त्यांना सुरक्षितस्थळी हलविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित जिल्हाधिका-यांना दिले.मराठवाड्यात सर्वत्र अतिवृष्टी झाल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. यावेळी बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांच्या जिल्हाधिका-यांशी फोनवरून संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेतला.

### काँग्रेसची पुन्हा पंतप्रधान मोदींवर टीका

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात पुन्हा एकदा आपल्या सवयीप्रमाणे जीएसटी दर कपातीचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. २०१७ मध्ये मोदीजींनीच स्वत: प्रचंड वाढीव दराने जीएसटी आणून देशातील उद्योग, व्यापारी आणि सामान्य नागरिक यांना त्रस्त केले, त्यांची प्रचंड आर्थिक लूट केली. तेच मोदीजी आज जीएसटी दर कमी केले म्हणून स्वत:ची पाठ थोपटून घेत आहेत.गेल्या आठ वर्षांत जीएसटी संकलन दुप्पट वाढून २२ लाख कोटींवर गेले आहे आणि याचा सर्वाधिक फटका ग्राहक व छोट्या व्यवसायांना बसला आहे.

### मदत व बचाव कार्यास सर्वोच्च प्राधान्य

मुंबई : राज्यात सध्या सुरू असलेल्या पावसामुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीत नागरिकांच्या मदत व बचाव कार्यासाठी संबंधित जिल्हा प्रशासनामार्फत सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे निर्माण होत असलेल्या परिस्थितीवर राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून लक्ष ठेवण्यात येत असून यासाठी जिल्हा प्रशासनास आवश्यक मदत व साधनसामग्री उपलब्ध करून दिली जात असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून करण्यात आले आहे. सध्या सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण होणा-या पूर परिस्थितीत नागरिकांनी सतर्क राहावे.

### शिंदे 'आपल्या' मंत्र्यांची केली कानउघाडणी

मुंबई: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पाठोपाठ एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पक्षाच्या मंत्र्यांची कानउघाडणी केली आहे. अकार्यक्षम मंत्र्यांना एकनाथ शिंदे यांना सुनावल्याची माहिती आहे. मंत्र्यांच्या कार्यपद्धतीवर शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. पक्ष संघटनेसाठी वेळ न देणाऱ्या मंत्र्यांना एकनाथ शिंदे झापलं. महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यापासून एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे मंत्री सर्वाधिक वादग्रस्त राहिले आहेत. त्याचा फटका शिंदेसेनेला येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिंदे स्वपक्षीय मंत्र्यांना निर्वाणीचा इशारा दिला आहे.

### सीएमने कंबोजसाठी भूखंडाचे आरक्षण बदललं

मुंबई : महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वसाहतींसाठीची आरक्षित असलेला भूखंड आपल्या मित्राच्या घशात घालण्यासाठी नियम वाकवण्यात आले, देवाभाऊंनी त्यांचे मित्र मोहित कंबोज यांच्या कंपनीला रातोरात मालामाल केल्याचा आरोप मुंबईच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी केला. महापालिकेचा जुहूतील अंदाजे ८०० कोटींचा भूखंड देवाभाऊंनी मोहित कंबोज यांच्या बांधकाम कंपनीला दिल्याचा आरोप वर्षा गायकवाडांनी केला.देवाभाऊ आपल्या लाडक्या बिल्डरांना रात्रीत मालामाल करत आहे. त्यासाठी लाडकी बहीण आणि सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला जातोय असा आरोप वर्षा गायकवाड यांनी केला.

### पडळकर म्हणजे बेन्टेक्सचे सोने -रोहित पवार

सांगली ; गोपीचंद पडळकर म्हणजे बेन्टेक्सचे सोने आहे. हा विषय तालुका, जिल्ह्याचा नाही तर महाराष्ट्राचा आहे, महाराष्ट्र धर्माचा आहे. आम्हीही खालच्या पातळीवर जाऊन बोलू शकतो, पण आम्ही शब्दांची पातळी जपतो. काही लोक स्वत:ला चाणक्य समजतात, या नेत्यांनी काही दिवसांपूर्वी जाहिराती दिल्या, निनावी जाहिराती दिल्या. गलिच्छ राजकारण महाराष्ट्रात फडणवीस यांनी आणले आहे, असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गोपीचंद पडळकर यांच्यावर हल्लाबोल केला.

## ओबीसी आंदोलक वाघमारेंची कार पेटवली

जालना । प्रतिनिधी

ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांची चारचाकी स्कॉर्पिओ गाडी एका अज्ञात व्यक्तीने पेटवून दिली आहे. रविवारी रात्री उशिरा तोंडाला रुमाल बांधलेली एक व्यक्ती नवनाथ वाघमारे हे वास्तव्यास असलेल्या इमारतीबाहेर आली आणि त्याने पार्किंगमध्ये उभी असलेली वाघमारे यांची गाडी पेटवून दिली. जालना शहरातल्या नीलम नगर भागात ही घटना घडली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, नीलम नगर भागातील कॉलनीत ज्या



ठिकाणी नवनाथ वाघमारे यांची गाडी उभी होती तिथे एक अज्ञात व्यक्ती हातामध्ये ज्वलनशील पदार्थ घेऊन आला आणि गाडीवर टाकलेल्या कव्हरवर पहिल्यांदा त्याने कॅनमध्ये ▶▶ पान २ वर

## मराठा आरक्षण जीआर विरोधातील याचिकेवर सुनावणीस हायकोर्टाचा नकार

मुंबई । प्रतिनिधी

**हैदराबाद गॅझेटियर जीआर विरोधातील याचिकेवर सुनावणीस सोमवारी (दि.२२) मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला. यामुळे आता मराठवाड्यातील मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

मनोज जरांगे पाटील यांनी एने गणेशोत्सवात मुंबईत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी बेमुदत उपोषण केले. पाच दिवसांनंतर राज्य सरकारने त्यांनी केलेल्या हैदराबाद गॅझेटियरला मान्यता देण्याची मागणी मान्य केली. राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियरला मान्यता देणारा शासन आदेश काढला होता. हैदराबाद गॅझेटियरला मान्यता देण्याच्या आदेशाविरोधात महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, सदानंद मंडलिक आणि कुणबी सेनेकडून या आदेशाविरोधात मुंबइं उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आला होत्या. महाराष्ट्र सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेला शासन आदेश हा घटनाबाह्य आहे. तो तत्काळ रद्द करण्याची तसेच या निर्णयात सुधारणा करण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली होती. आज न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि संदेश पाटील ▶▶ पान २ वर

## पती- पत्नीला एकाच ठिकाणी नोकरीवर बंदी

मुंबई । प्रतिनिधी

बँकेत काम करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्वाची आहे. कारण बँकेत काम करण्याचे नियम आणि अटी सध्या वाढत चालल्या आहेत. राज्य सहकारी बँकेने पती- पत्नी या दोघांनाही एकत्र बँकेत काम करण्यास मनाई केली आहे. हे धोरण राज्य सहकारी बँकेने लागू केले असून, काही अटींचे पालन करायला सांगितले आहे. आता असाच काहीसा निर्णय इतर शासकीय कार्यालयात देखील होणार का याकडे लक्ष लागले आहे. ▶▶ पान २ वर

## मुंडेंना रोजगार हमीचे काम द्या - जरांगे पाटील

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा रायगडमध्ये जाहीर सत्कार सोहळा पार पडला, या कार्यक्रमात बोलताना धनंजय मुंडे यांनी सुनील तटकरे यांच्याकडे मोठी मागणी केली, 'माझ्या हाताला आता काहीतरी काम द्या. कायम आम्हाला मार्गदर्शन करत राहा. आम्ही चुकलो तर कान धरा, पण आता



आम्हाला रिकामे ठेवू नका. आम्हाला जबाबदारी द्या, असे मुंडे यांनी म्हटले होते. त्यावर आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांना रोजगार हमीचे काम द्या, अशी खोचक प्रतिक्रिया दिली आहे.

जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली, या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला, या प्रकरणानंतर राज्यात वातावरण चांगलेच तापले. दरम्यान या प्रकरणात वाल्मिक कराड याचे नाव आले, वाल्मिक ▶▶ पान २ वर

## बीड रेल्वेच्या उर्वरित भूसंपादन प्रक्रियेला गती द्या-अजित पवार

मुंबई । प्रतिनिधी

मराठवाड्याच्या सामाजिक, आर्थिक विकासाला गती देण्यासाठी बीड ते परळी रेल्वेमार्ग लवकरात लवकर सुरु करण्याची गरज आहे. हा रेल्वे मार्ग झाल्यानंतर परळी ते थेट अहिल्यानगरपर्यंत प्रवास करता येणार आहे. त्यामुळे या मार्गासाठी उर्वरित भूसंपादन प्रक्रियेला गती द्यावी असे निर्देश उपमुख्यमंत्री ▶▶ पान २ वर

## माळ दुसरी



द्वितीयेचे दिवशी मिळती
चौंसष्ट योगिनी हो ।।
सकळांमध्ये श्रेष्ठ
परशुरामाची जननी हो ।।
कस्तुरीमळवट भांगी
शेंदूर भरूनी हो ।।
उदोकारें गर्जती सकल
चामुंडा मिळुनी हो ।। २ ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।। ध्रु० ।।

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४४.५० क्विंटल | २,४०० | ३,०३० | २,६४९ |
| ज्वारी/हायब्रिड : २२.०० क्विंटल | २,३०१ | २,६८० | २,४४४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ९.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| उडीद : ३२.०० क्विंटल | ३,७७१ | ५,४०१ | ४,८२६ |
| बाजरी: ६.५० क्विंटल | २,३६५ | २,६५१ | २,५०८ |
| मुग: २.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| सोयाबीन: ३२.५० क्विंटल | ३,७२५ | ४,२०० | ३,९४३ |
| हरभरा:८.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |

## तुळजापुरात घटस्थापनेने श्री तुळजाभवानी देवींच्या शारदीय नवरात्र उत्सवास प्रारंभ

# पहिल्याच दिवशी लाखो भाविकांनी घेतले दर्शन

तुळजापूर । प्रतिनिधी

**महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास सोमवार,आश्विन शुक्ल प्रतिपदेला धार्मिक उत्साह व भक्तिभावाच्या वातावरणात प्रारंभ झाला. पहाटे मंदिरात पारंपरिक पद्धतीने श्री तुळजाभवानी देवीची सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. दुपारी बारा वाजता**



**जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते मंत्रोच्चार, पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि ''आई राजा उदो-उदो'' च्या जयघोषात घटस्थापना विधी पार पडला.**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवरात्र महोत्सवात सहभागी होण्यासाठी तुळजापूर नगरीत महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्रप्रदेशातून हजारो भाविक दाखल झाले. महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी भाविकांनी मोठ्या संख्येने ▶▶ पान २ वर

### महोत्सवाचे स्वरूप

पुढील नऊ दिवस तुळजापूर नगरीत भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळणार असून, धार्मिक विधींसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देवीभक्तांसाठी हा उत्सव अध्यात्म, श्रद्धा आणि संस्कृती यांचा अनोखा संगम ठरणार आहे.

cmyk

cmyk



अग्रलेख

# सुरक्षीत माता, सुरक्षीत कुटुंब हे तत्व रूजले जावे

महिलाकेंद्री विविध योजना जाहीर करण्यात बहुसंख्य राज्ये आघाडीवर आढळतात. राज्यानुसार योजनांची नावे वेगळी असू शकतात; पण उद्देश सर्वांचाच सारखा असावा. अशी कोणतीही योजना जाहीर झाली की विरोधी पक्ष टीकेची झोड उठवतात. 'सत्ताधाऱ्यांचा निवडणूक जिंकण्याचा फंडा' अशी टिप्पणी करतात तर सरकारे त्याला 'महिलांप्रती संवेदनशीलता' संबोधतात. त्यातील तथ्याचा वाद क्षणभर बाजूला ठेवला तर केंद्र आणि राज्य सरकारच्या दोन नव्या घोषणा आरोग्याचा विचार करण्यास महिलांना प्रेरित करणाऱ्या ठरू शकतात. 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' योजनेंतर्गत महिलांच्या विविध आरोग्य तपासण्या करणे सुरू झाल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. यामध्ये सामान्य ते दुर्धर व्याधींच्या चाचण्या मोफत केल्या जात असल्याचे म्हटले आहे. तर दुसऱ्या बाजूला राज्यात समग्र उपचार सेवा केंद्रे उभारण्याचे आदेश राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी नुकतेच दिले आहेत. वास्तविक महिलांमधील वाढते अनारोग्य हा सामाजिक चिंतेचा विषय आहे. उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि मधुमेहाचे वाढते प्रमाण आहे. कॅन्सरविषयीचे एक संशोधन नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. तशी सर्वेक्षणे अधूनमधून प्रसिद्ध होतात. त्यात पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये कॅन्सरचे प्रमाण जास्त असल्याचा निष्कर्ष नमूद आहे.

राज्यात राबवलेल्या एका शिबिरात एक महिन्याच्या कालावधीत सुमारे आठशे महिलांना कॅन्सर आढळल्याची आकडेवारी सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी विधानपरिषदेत दिली होती. एकुणात काय तर, महिलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होत असला तरी महिलांच्या वैयक्तिक पातळीवर आणि समाजरचनेच्या उतरंडीत तो काहीसा दुर्लक्षित विषय आढळतो. समाजरचनेत महिला दुय्यमस्थानी मानल्या जातात. महिलांच्याही ते इतके अंगवळणी पडले आहे, की आरोग्याच्या बाबतीतही त्या स्वतःला प्राधान्य देताना आढळत नाहीत. पुरुष कर्ता मानला जात असला तरी घर राखण्यात महिलाच खऱ्या कर्त्या असतात. घरादाराची आणि कुटुंबातील सदस्यांची काळजी घेणे हे त्या त्यांचे कर्तव्य मानतात. त्यामुळे आजारी पडणे परवडत नाही असा समज बहुसंख्य महिलांमध्ये रुजलेला आढळतो. दुसरे कारण आर्थिक संभवते. वैद्यकीय उपचार दिवसेंदिवस महागडे होत आहेत. चाचण्या करण्याचे दरही आवाक्याबाहेर चालल्याची भावना लोक व्यक्त करतात. परिणामी, पदराला खार लावून चाचण्या करून घेतल्या आणि त्या सकारात्मक आल्या तर खर्चिक उपचार करावे लागतील अशी भीती महिलांना वाटू शकणे स्वाभाविक. विशेषतः, कॅन्सरवरचे उपचार कुटुंबाचे आर्थिक भविष्य बिघडवणारे ठरू शकतात. मासिक पाळीच्या चक्रात झालेल्या दीर्घकालीन बिघाड हा प्रसंगी महिलांसाठी जीवघेणा ठरू शकेल, अशी भीती वैद्यकीय तज्ज्ञ व्यक्त करतात. परिणामी सामान्य महिला चाचण्या करायलाच नकार दर्शवतात. कदाचित त्यामुळेच अनारोग्याच्या छोट्या मोठ्या लक्षणांकडे बहुसंख्य महिला दुर्लक्ष करतात. तथापि, चाचण्या आणि मर्यादित स्वरूपात मोफत उपचार देऊ शकणाऱ्या केंद्र आणि राज्य सरकारच्या आरोग्य योजना या मानसिकतेवर आणि उणिवांवर मात करणाऱ्या ठरू शकतील.

या योजना तितक्याच प्रभावीपणे अंमलात आणल्या जातील याची दक्षता संबंधित सरकारांनी घ्यायला हवी. महिलांच्या मानसिक परिवर्तनाचे आव्हान पेलावे लागेल. मोफत योजना आहे म्हणून महिला मोठ्या प्रमाणावर तपासण्या करून घेतील हा कदाचित सरकारी भ्रम ठरू शकेल. चर्चेच्या ओघात देखील महिला त्यांच्या वाढत्या अनारोग्यावर बोलण्यास उत्सुक नसतात. तेव्हा आरोग्याविषयी त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे अपेक्षित आहे. या क्षेत्रात अनेक सामाजिक संस्था स्वयंस्फूर्तीने काम करतात. योजनेच्या अंमलबजावणीसाठी, महिलांना समुपदेशनासाठी त्यांची मदत घेता येऊ शकेल.

एरवी योजना ढीगभर आणि अंमलबजावणी हातभर अशी परिस्थिती आढळते. तसे या योजनेचे आणि सरकारी निर्णयाचे होऊ नये. किमान या योजनांकडे तरी निवडणुकीचे राजकारण म्हणून पाहिले जाऊ नये असे लोकांना वाटते. कोणत्याही व्याधीचा संसर्ग पहिल्या टप्प्यात लक्षात आला तर व्याधीमुक्त होण्याची शक्यता कैकपटीने जास्त असते. तेव्हा सार्वजनिक आरोग्य सेवेचा फायदा घेऊन तपासण्या करून घेणे, योजनांना सकारात्मक प्रतिसाद देणे हे महिलांचे देखील सामाजिक कर्तव्य आहे.

## त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारांवर हल्ला गुंडांवर कठोर कारवाईची मागणी



पत्रकारांवर हल्ला म्हणजे पिडित, वंचित, शोषित तसेच सर्व सामान्य जनतेवर झालेला हल्ला आसतो. त्यामुळे अशा हल्लेखोर गुंडाना सरकारने कठोर शासन करुन सर्व सामान्य जनतेचा आवाज अबाधित ठेवावा. ल.

**–दिनकर जाधवें केज ता.अध्यक्ष राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ (भारत)**

**बीड । प्रतिनिधी**

**त्र्यंबकेश्वर (जि.नशिक) येथील टोल नाक्यावर काही गुंडांकडून पत्रकारावर अमानुष हल्ला करण्यात आला असून त्यांना जीवे मारण्याचा त्यांचा प्रयत्न झाला होता. अशा गुंडांना तात्काळ अटक करून कठोर शासन करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुका शाखेच्या वतीने केज तहसीलदार तसेच केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आले.**

सर्वसामान्य, पीडित, शोषित, वंचित घटकाचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचे प्रभावी साधन म्हणून सर्वजण पत्रकारांकडे पाहिले जाते. परंतु काही गुंडांना त्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे जणू काही कंत्राटच दिली आहे की काय ? असा संशय येताना दिसत आहे. कारण त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथील पत्रकार योगेश खरे, अभिजीत सोनवणे, किरण ताजने हे बातमी करण्यासाठी या टोलनाका परिसरात आले असता येथील गुंडांकडून त्यांना अमानुष हल्ला करून त्यांना जिवे मारण्याचा कट रचला होता, असा संशय येत असून राज्याचे गृहमंत्री यांनी या प्रकाराची तात्काळ दाखल घेऊन पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने दि.२२ सप्टेंबर रोजी केज तहसिलदार राकेश गिड्डे तसेच केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी बीड जिल्हा अध्यक्ष रंजीत घाडगे, केज तालुका अध्यक्ष दिनकर जाधव, केज ता.सचिव मनोराम पवार, कोषाध्यक्ष सचिन भालेराव, संपादक अजय भांगे, पत्रकार शेख सनी, पत्रकार प्रदिप गायकवाड, पत्रकार विनोद शिंदे, पत्रकार लिंबराज गायकवाड यांची उपस्थिती होती.



## अतिवृष्टी बाधीत गावाची जिल्हाधिकारी मित्तल यांनी केली पाहणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात आठ दिवसापासून तसेच २२ सप्टेंबर रोजी मध्यरात्री जोरदार अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे विरेगाव येथील १४ नागरिक पुरात अडकले होते असता जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर आणि जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन अग्निशमन दलाच्या जवानांच्या सहाय्याने पुरात अडकलेल्या १४ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविले. तसेच जालना तालूक्यातील सेवली मंडळात काल रात्री सुमारे ६५ मि.मी. पाऊस पडला. यामुळे सेवली मंडळातील उखळी येथील पाझर तलाव अतिवृष्टीने फुटल्याने याठिकाणच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्याअनुषंगाने आमदार अर्जुनराव खोतकर आणि जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी आज जालना तालूक्यातील विरेगाव, सेवली व नेर मंडळाचा दौरा करुन अतिवृष्टीने झालेल्या नुकसानग्रस्त भागांची पाहणी करुन, संबधीतांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले. तसेच नागरिकांशी संवाद साधुन शासन प्रशासन आपणांस सर्वोतोपरी सहकार्य करेल असे आश्वासन दिल यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर, जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, उपविभागीय अधिकारी जालना रामदास दौंड, तहसीलदार जालना श्रीमती छाया पवार आदींची उपस्थिती होती.

## अतिवृष्टीच्या उपाययोजनांवर ना.पंकजा मुंडे आज मुख्यमंत्र्यांना भेटणार

**बीड । प्रतिनिधी**

**काल रात्री पुन्हा एकदा अतिवृष्टीने जिल्ह्याला झोडपले. शिरूर कासार, बीड तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसाने नागरिक उघड्यावर आले. दरम्यान, अतिवृष्टीने जिल्ह्यातील परिस्थिती गंभीर बनली असून यावर उपाययोजना करण्यासाठी आपण उद्या मुख्यमंत्र्यांशी भेटून चर्चा करणार असल्याचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.**

बीड जिल्ह्याचा आठवडाभराचा दौरा करून अतिवृष्टीत झालेल्या नुकसानीची पाहणी करून, प्रशासनाची आढावा बैठक घेऊन ना. पंकजाताई मुंडे मुंबईला रवाना झाल्या. आपल्या दौऱ्यात शासकीय अधिकाऱ्यांचा अधिकचा वेळ न घालवता नुकसानीचे पंचनामे आणि मदतीला जाण्यासाठी त्यांनी सांगितले. उद्याच्या मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित राहण्यासाठी आज मुंबईत पोचताच काल रात्रीपासून शिरूर कासार, बीड आणि अन्य ठिकाणच्या अतिवृष्टीची माहिती त्यांना समजली. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील परिस्थिती गंभीर बनली आहे, उद्याच आपण यासंदर्भात कॅबिनेट मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलून मदतीबाबत आग्रह धरणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात ना पंकजाताईंनी नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. त्या म्हणाल्या, अतिवृष्टीचा आढावा घेतला, अधिकाऱ्यांना पंचनाम्याचे, मदतीचे आदेश दिले पण आज मदत, पैसाअडका हे महत्वाचे नाही तर तुमचे मनोबल महत्वाचे आहे.आपलं घर डोळ्यासमोर वाहून जाताना पाहून तुम्हाला काय यातना होत असतील याची कल्पना मी करू शकत नाही. कॅबिनेट मध्ये आपली प्रतिनिधी म्हणून हेच बोलण्यासाठी मी मुंबईत आले आहे. उद्या मुख्यमंत्र्याशी यावर बोलेल आणि पुन्हा लगेच जिल्ह्यात येईल, जिथे शक्य आहे तिथे भेट द्यायला आणि तुमचे मनोबल वाढवायला, त्यामुळे घाबरून जावू नका, मनोबल हारू नका, स्वतःच्या जीवाची काळजी घ्या, उगीचच पुराच्या पाण्यात जावू नका, मी कलेक्टरशी बोलले, जेवढी यंत्रणा शक्य आहे, तेवढी वापरून अडकलेल्या लोकांना बाहेर काढत आहोत. मी लगेच येत आहे, तुमचा धीर वाढविण्यासाठी असं त्या म्हणाल्या. दरम्यान ना पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेनुसार भाजपच्या कार्यकर्त्यांनी ब्रह्मनाथ येळंब येथे पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांना मदत करून त्यांना जीवनावश्यक वस्तू, खाद्यपदार्थ त्यांच्यापर्यंत पोचवले. रामदास बडे, जालिंदर सानप, विवेक पाखरे आदी कार्यकर्त्यांनी ही मदत संकटात सापडलेल्या ग्रामस्थांपर्यत पोचवली.

## पान ६ वरून...

### वरुणराजाचा प्रकोप

यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पुन्हा एकदा पाणी आले आहे. शेतामध्ये होणारे नुकसान पाहून शेतकऱ्यांना गहिवरून येत असून येत असेल अनेकांना अश्रू अनावर झाले आहेत. सिंदफणा नदीच्या तीरावर्ती सुमारे एक किलोमीटर रुंदीचे पाणी वाहत असून यामध्ये हजारो हेक्टर शेती जमीन दोस्त झाली आहे. गेल्या अनेक वर्षानंतर पहिल्यांदाच असे हे विदारक चित्र तालुक्यातील शेतकऱ्यांना पाहायला मिळाल्याने किंबहुना नुकसानीला सामोरे जायची वेळ आल्याने शेतकरी राजा आता पुरताच हापकला आहे. तर या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रशासन अगदी सकाळपासूनच धावून कामाला लागले असून आपत्कालीन व्यवस्थेबद्दल सतर्क झाले आहे.

--------------

### आ.संदीप क्षीरसागर नागरिकांना

नदीला मोठा पूर आला होता. संदीप भैय्यांनी त्याठिकाणी जाऊन गावातील ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांना धीर देऊन या अतिवृष्टीच्या काळात कोणताही धोकादायक प्रवास न करण्याचे आवाहन केले. शिरापूर गात या ठिकाणी देखील अतिवृष्टी झाल्याने पूर आला होता. या पुरात काही नागरिक अडकले होते. याची माहिती मिळताच संदीप क्षीरसागर यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन आपत्ती निवारण विभागाच्या मदतीने पुरात अडकलेल्या सर्व नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर केले. या आपत्तीमध्ये जीवितहानी टाळण्यासाठी प्रशासन व कार्यकर्त्ये अहोरात्र प्रयत्न करत आहेत.संकटाच्या काळात धीर सोडू नका मी आपल्या सोबत असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी नागरिकांना धीर दिला.

--------------

### माजलगाव धरणातून

माजलगाव धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे.परिणामी धरणातील पाण्याच्या पातळीत वाढ होत असून,दि २२ सप्टेंबर सोमवार रोजी सकाळी ८:०० धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील चालु आवक लक्षता घेता धरणाच्या जलप्रचलन आराखड्यानुसार जलपातळीचे नियमन करणे आवश्यक असल्यामुळे माजलगांव धरणातून द्वार क्रमांक ११,६,१६,१०,१२, हे ५ गेट ०:५० मिटरने तर धरणाच्या सांडव्याचे वक्रद्वार११,६,१६,१०,१२ हे २:५० मिटररने आणी द्वार क्रं९,१३,८,१४,७,व १५ हे २.०० मिटरने उघडण्यात आले आले असुन धरणातुन सिंधफाना नदीपात्रात ८८ हाजार ५९४.७७ क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला आहे.त्यामुळे माजलगव तालुक्यातील ३२ गावांत पुरस्थिती निर्माण झाल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला असुन शहरातील सिंधफाना नदीवरील जुना पुल पाण्याखाली गेलेला आहे.त्याअनुषंगाने माजलगांव तालुक्यातील सर्व गोदावरी/सिंदफणा नदीकाठच्या गावातील लोकांना प्रशासनाच्या वतीने अतिदक्षतेचा इशाही देण्यात आला आहे.

--------------

### सिंदफणा नदीने दिड किलोमीटर

झाला नसल्याचे अनेक बुजुर्ग लोकांनी सांगितले, हीच परिस्थिती रात्री झाली असती तर काहीच करता आले नसल्याचे त्यांनी सांगितले, गेली पंधरा दिवसापासून जिल्हात पावसाने धुमाकूळ घातला असुन, हाता तोंडाशी आलेला खरीप हंगामातील पिकांचा चिखल झाला आहे, त्यातच रविवारी रात्री व सोमवारी पहाटे अचानक ढगपुटी झाल्याने जिल्हातील ओढे, नद्या नाले ओसंडून वाहात आहेत, सिंदफणा नदीने लगतचे एक, ते दिड किलोमीटर पात्र सोडल्याने शेतीपिकासह राण वस्तीवर राहणार्या शेतकरी पुरता सैरावैरा झाला आहे, शेत वस्तीवर च्या राहत्या घरात पाणी शिरल्याने धान्य, व संसार उपयोगी वस्तू मोठे नुकसान झाल्याने अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत,

**सिंदफणा लगत खरडून गेलेल्या शेतीचे काय**

सिंदफणा नदी लगत अनेक शेतकर्यांचे वहीती क्षेत्र खरडून गेल्याने आशा शेतकर्यावर भिक मागण्याची परिस्थिती आली असुन मायबाप सरकारने विनाविलंब भरपाई द्यावी आशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे,

**गेली पन्नास वर्षात आशी वेळ आली नव्हती,**

गेली पन्नास वर्षे आगोदर आशी वेळ आली नव्हती असे अनेक बुजुर्ग लोकांनी बोलताना सांगितले, आगोदर तर सिंदफणा नदीचे पात्र खोलगट नव्हते, वाळू तस्करांनी तीन ते चार परस पेक्षाही पात्र खोल केले, तरी दिड किलोमीटर सिंदफणा नदीने पात्र सोडल्याचे, आवर्जून त्यांनी सांगितले,

--------------

### पाटोदा शहराला पुराचा

कोणाचा धोका कायम आहे काही ठिकाणी शेतकऱ्यांचे सोयाबीन वाहून गेले असून घरांनी पाणी शिरले आहे मांजरा नदीकाठच्या दुकानाने हे पाणी शिरले होते काही घरांची पडझडी झाली होती. ॲड जब्बार पठाण यांच्या टीमने रात्रभर मदत कार्य सुरू ठेवले होते. त्यांच्या या कार्यामुळे सर्वत्र कौतुक होत आहे.

--------------

### पिंपळवंडी नदीवर

हेळसांड थांबविण्यासाठी या नदीवर कमानीचा उंच पूल उभारावा अशी मागणी प्रा.अशोक पवार पाटोदा उपतालुकाप्रमुख शिवसेना उबाठा, विनोद पवार पाटोदा तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी शरद पवार गट व ग्रामस्थांकडून होत आहे. या नदीच्या काठालगत इ.१ ली ते ७ वी पर्यंत केंद्रीय जिल्हा परिषद शाळा व पिंपळवंडी गाव आहे.गावातून या पुलावरून श्री.स्वामी अमृत भारती विद्यालय,अश्वलिंग विद्यालयात विद्यार्थी ये-जा करतात.तसेच जिल्हा परिषद शाळेत,अंगणवाडीत,बस स्टॅन्ड परिसर वस्तीतील व गाव अंतर्गत खालचा-वरचा मळा,पाटील वस्ती, गोरसाळे वस्ती येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने येतात.पुलाच्या वरून पाणी वाहत असताना विद्यार्थ्यांना पाणी ओसरेपर्यंत थांबावे लागते.त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सोमवार दि.१५/०९/२०२५ व सोमवार दि.२२/०९/२०२५ रोजी या नदीला पूर आल्याने दुपारपर्यंत पूर ओसरलाच नाही.त्यामुळे विद्यार्थी शाळेत पोहोचलेच नाहीत.

दि.१५/०९/२०२५ रविवार,दि.२१/०९/२०२५ रविवार रोजी रात्रभर मुसळधार पाऊस झाला होता.रात्रभर पाऊस पडत राहिला तर पुराच्या भितीने ग्रामस्थांची झोप उडते.प्रत्येक वर्षी होणाऱ्या पावसाळ्यात हीच समस्या ग्रामस्थांना भेडसावीत आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान व महापुरामुळे गावाला होणारा धोका टाळण्यासाठी जि.प.शाळेपासून दगडे, भालेकर यांच्या घराजवळून बीड- अहिल्यानगर महामार्गावरील पिंपळवंडी येथील पुलापर्यंत संरक्षक भिंत (कठडा) बांधून नदीवर गावात जा-ये करण्यासाठी असणाऱ्या पुलांची उंची वाढवावी याची प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन उपाययोजना करून समस्या मार्गी लावावी अशीही मागणी जोर धरत आहे.

--------------

### गेवराई शहराला पाण्याचा

पाणी येईल आणि पूल बंद पडेल. अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. गेवराई शहराच्या पश्चिम दिशेला मन्यारवाडी,गोविंदवाडी आदि दहा बारा गावे आहेत. शहरात येण्यासाठी चिंतेश्वर मंदिरा जवळ छोटा पूल आहे. तो पूल रात्री पासून पाण्यात आहे. मन्यारवाडी जवळ गेवराई चिंतेश्वर विद्यालय आहे. पुलावर पाणी आल्याने शाळेला सुट्टी जाहीर करण्यात आली असून, शाळेच्या मुख्याध्यापिका बोर्डे मॅडम यांच्यासह शिक्षकांची टीम, सकाळ पासून पुलाजवळ थांबून, विद्यार्थ्यांना घरी जाण्याची सूचना करत आहेत.गेवराई शहरा जवळून वाहणाऱ्या विद्रुपा नदीला पूर आला असून, नदी पात्र दुथडी भरून वाहत आहे. महादेवाच्या मंदिरातपाणीच पाणी झाले आहे. त्यामुळे, सकाळी भाविकांना दर्शन घेता आले नाही.दरम्यान, पावसाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जात असल्याने, गेवराई - संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर असलेला जमादारनीचा पूल धोकादायक होऊ शकतो. आणखी पाऊस आल्यास, राष्ट्रीय महामार्गावर पाणी येईल, अशी भिती वाटत आहे. गेवराई जवळचा जमादारनीचा पूल, दत्त पार्क , मन्यारवाडी, या विद्रूपा नदीपात्रात असलेल्या चार ठिकाणच्या पुलाची उंची वाढविण्याची मागणी होऊ लागली आहे. दरम्यान, रविवार ता. २१ रोजी रात्रभर कोसळधार राहील्याने, गेवराई तालुक्यातील विविध भागातील नदी, नाले दुथडी भरून वाहत असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी संपर्क तुटला. चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गेवराई तालुक्यातील गंगावाडीचा पूल पाण्यात गेला आहे. गेवराई-शेवगाव राज्य रस्त्यावर पाणी आले आहे. गेवराई - शेवगाव रस्त्यावर, धोंडराई जवळचा पूल पाण्यात गेला आहे. त्यामुळे, दोन्ही बाजुंची वाहतुक बंद आहे. रविवार च्या एकाच रात्रीत ९० मिमि पाऊस पडल्याची नोंद झाल्याची माहिती आहे. गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे यांनी पावसाचा आढावा घेऊन, पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आला आहे.

----------

## पान १ वरून...

### मराठवाड्यात पावसाळी

आदी जिल्ह्यांत अतिवृष्टीने कहर केला आहे. बीड जिल्ह्यात रविवार रात्रीपासूनच पावसाने जोर धरला. तो सोमवारीही कायम होता. यामुळे शिरूर येथील सिंदफणा नदीला मोठा पूर आला. त्यामुळे नदीकाठच्या परिसरात भीती पसरली आहे. तहसील प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. या भागात घरांसह दुकानात पाणी शिरले असून मोठे नुकसान झाले आहे. धाराशिव जिल्ह्यातही पावसाचा कहर पाहायला मिळत आहे. अतिवृष्टीमुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. भूम आणि परांडा तालुक्यातील चांदणी नदीला पूर आला आहे. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील घरात पाणी शिरले आहे. परांडा तालुक्यातील शिरसावच्या नदीला पूर आल्यामुळे नदीच्या पलीकडे जवळपास दोनशे ते तीनशे लोक अडकलेले आहेत. लातूरमध्ये भादा मंडळातील भेटा, अंदोरा, वडजी, काळमाथा, बोरगाव,जायफळ,नाहोली, बऱ्हाणपूर, कवठाकेज या गावच्या शेतशिवारात जोरदार पाऊस झाला आहे. तसेच शेती पिकांचे नुकसान झाले आहे. भेटा ते अंदोरा या मार्गावरील पूल पाण्याखाली गेल्याने वाहतुकीसाठी हा मार्ग बंद करण्यात आला आहे. तर जालना जिल्ह्यात पावसाने नद्या नाले एक झाले आहेत. अंबड तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला. बाजारपेठेत पाणी शिरले आहे. जालना, घनसावंगी आणि बदनापूर तालुक्यामध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. जालना तालुक्यातील सेवली, धारा, पाथरूड, उमरी, शिवनगर, उखळी, या परिसरात शेतांत पाणी साचून शेती पिकांचं नुकसान झाले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड तालुक्यात वाकी नदीला पुन्हा एकदा मोठा पूर आला आहे. तर पैठण तालुक्यातही पावसाने जोरदार हजेरी लावली. पैठण शहरालगत असलेल्या राहुल नगर भागात १०० घरात पाणी शिरले. या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, मका, तूर, उडीद, ऊस, कांदा, भाजीपाला आणि फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामध्ये आणखी वाढ होण्याची चिन्हं दिसू लागली आहेत. त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी केली जात आहे. तर राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी विरोधकांनी केली आहे.

-----------

### मराठा आरक्षण जीआर विरोधातील

यांच्या खंडपीठाचा या याचिकांवर सुनावणीस नकार दिला. तांत्रिक कारणांमुळे खंडपीठाने हा निर्णय घेतला आहे.

-------

### ओबीसी आंदोलक

असलेला ज्वलनशील पदार्थ चारही बाजूंनी टाकला आणि त्यानंतर ही आग लावून दिली. या आगीने भडका घेताच गाडीवर टाकलेल्या कव्हरसह पूर्ण गाडी क्षणातच जळून खाक झाली.दरम्यान, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून मोठा अनर्थ टळला आहे. या संपूर्ण प्रकरणी ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी कदीम जालना पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे असून ज्या व्यक्तीने ही चारचाकी गाडी जाळली त्याचा सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांकडून तपास सुरू आहे.

----------

### बीड रेल्वेच्या उर्वरित भूसंपादन प्रक्रियेला

अजित पवार यांनी रेल्वे आणि संबंधीत जिल्हाधिका-यांना दिले.

पुणे येथे अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारशी समन्वय ठेऊन प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिका-यांना दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात, उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, तसेच विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत अनेक प्रकल्पांच्या कामाचा आढावा घेण्यात आला. पुणे मेट्रो लाईन-३ शिवाजी नगर ते हिंजवडी या प्रकल्पाचे काम गतीने पूर्ण करावे. प्रकल्पाचे काम दर्जेदार झाले पाहिजे, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी केली. सध्या सणासुदीचे दिवस असल्याने मेट्रोच्या प्रकल्पांचे काम करीत असताना पुलांखाली वाहतूक कोंडी होऊ नये याची दक्षता घ्यावी असे निर्देश त्यांनी दिले. कर्जत-भिमाशंकर-खेड-शिरुर हा नवीन महामार्ग करण्यासंदर्भात त्यांनी आढावा घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. अजित पवार यांनी यावेळी वढू व तुळापूर येथील स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज स्मारक, पुणे येथील वीर वस्ताद लहूजी साळवे स्मारक, लोणावळा येथील नियोजित स्काय वॉक, टायगर पॉईंट, 'सारथी' संस्थेच्या नाशिक, कोल्हापूर, नागपूर, खारघर, संभाजीनगर, अमरावतीच्या विभागीय उपकेंद्रांचे बांधकाम, सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालय, सातारा सैनिक स्कूल, वडाळा येथील जीएसटी भवन, रेडिओ क्लब मुंबई, रत्नागिरीचे मिरकरवाडा बंदर, कृषी भवन, कामगार कल्याण भवन, सहकार भवन, पुरंदर विमानतळ, ऑलंम्पिक भवन व संग्रहालय, पुणे, परळी आणि बारामती शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय आदी प्रकल्पांच्या प्रगतीचादेखील आढावा घेतला.

-----------

### मुंडेंना रोजगार हमीचे काम

कराड हा धनंजय मुंडे यांच्या जवळचा मानला जात असल्यानं, धनंजय मुंडे यांच्या देखील अडचणीत वाढ झाली, विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत होती, अखेर धनंजय मुंडे यांनी आपल्या तब्येतीचे कारण पुढे करत आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला, मात्र आता पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचे वेध लागल्याचे दिसून येत आहे. धनंजय मुंडे यांच्या या मागणीवर जरांगे यांनी खोचक टोला लगावला आहे. धनंजय मुंडे यांचे हात रिकामे आहेत, त्यांना रोजगार हमीचं काम द्या, त्यांना बराशी खोदायला पाठवा असे मनोज जरांगे यांनी मुंडे यांना म्हटले आहे. दरम्यान मराठ्यांच्या नादाला लागू नका, अन्यथा अजित पवारांना पण सोडणार नाही, त्यांचाही कार्यक्रम लावणार असा इशाराही यावेळी जरांगे पाटील यांनी दिला आहे. दरम्यान मुंडेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी ओबीसी आंदोलनाच्या लढ्यात यावे अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी दिली होती, त्यावरून देखील जरांगे यांनी निशाणा साधला आहे. ते सर्वांना असेच कामाला लावतात, मग अलीबाबाला खेळायला मैदान मोकळे राहते, ते लोकांकडून फुकटात काम करून घेतात असे जरांगे यांनी म्हटले आहे.

--------

### पती- पत्नीला एकाच

मुळात तुम्ही कुठेही काम करत असाल तर त्या कामासंबंधीत नियम पाळणे हे अत्यंत महत्वाचे असते. त्यातच राज्य सहकारी बँकेने पती व पत्नी यांना एकत्र काम न करण्याचे आदेश दिले आहेत. याचे कारण असे आहे की, पती व पत्नी एकाच संस्थेमध्ये काम करताना त्यांच्यामधील हितसंबंध, काही गुप्त माहिती तसेच गैरवर्तन टाळण्यासाठी हे धोरण लागू केले आहे. ठरलेले हे धोरण राज्य बँकेच्या प्रशासक सभेत मंजूर करण्यात आले आहे. जर तुम्ही आधीच काम करत असाल तर पती-पत्नींसाठीही बँकेने काही निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये पती- पत्नींपैकी ज्या कर्मचाऱ्याचे घरभाडे भत्ता जास्त असेल त्यालाच घरभाड्याचा लाभ मिळणार आहे. दोघांनाही एकाच वेळी लाभ घेता येणार नाही. मात्र जर पती-पत्नी वेगवेगळ्या शहरांमध्ये स्वतंत्र राहत असतील तर त्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास हा लाभ तुम्हाला घेता येईल. त्यामध्ये मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पनवेल हे एकच शहर मानले जाईल.

**पती-पत्नी असल्यास राजीनामा**

बँकेने लागू केलेल्या धोरणानुसार दोन कर्मचाऱ्यांचा विवाह झाल्यानंतर त्यांनी सहा महिन्यांत एचआरला त्याबद्दल कळवणे महत्वाचे आहे. विवाहानंतर ६० दिवसांमध्ये पती-पत्नींपैकी एकाला नोकरीचा राजीनामा द्यावा लागणार आहे. स्वच्छेने निर्णय न घेतल्यास बँकच हा निर्णय घेईल.

----------

### पहिल्याच दिवशी लाखो

उपस्थिती दर्शवत देवीच्या दर्शनाचा लाभ घेतला. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर प्रशासन, पोलीस विभाग, नगरपरिषद, महसूल प्रशासन तसेच आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा व राज्य परिवहन महामंडळ या विभागांकडून विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आरोग्य सेवा केंद्रे, वाहतूक व्यवस्था आणि स्वच्छता याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. घटस्थापना सोहळ्याला आमदार तथा विश्वस्त राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, सौमय्याश्री पुजार, जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील, मंदिर संस्थानच्या तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, महंत तुकोजी बुवा, महंत चिलोजी बुवा, महंत बजाजी बुवा, महंत वाकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा, पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम, विपिन शिंदे, अनंत कोंडो यांच्यासह पुजारी बांधव व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**घटस्थापनेचे महत्व**

घट बसविण्याची जागा ही सिंहाच्या गाभाऱ्यात देवींच्या डाव्या बाजूला असते. छत्रपती शिवाजी महाराजांनी श्री तुळजाभवानी देवीला अर्पण केलेल्या जमिनीतील माती घटस्थापनेकरिता आणली जाते. त्या मातीला वावरी असेही म्हणतात. प्रथेप्रमाणे धाकटे तुळजापुरातील कुंभार कुटुंबीयांकडून कलश येतो. या कलशामध्ये गोमुख व कल्लोळ तीर्थाचे पाणी भरलेले असते. जिल्हाधिकारी व पुजाऱ्यांच्या उपस्थितीत गोमुख तीर्थाजवळून वाजत गाजत घट कलश सिंहाच्या गाभाऱ्यात आणून प्रतिष्ठापित केला जातो. तसेच तुळजापुरातील शेटे कुटुंबीयांकडून सप्तधान्य (जवस, करडई, मूग, ज्वारी, गहू, मका व सातू) दिले जाते. घटाची स्थापना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते केली जाते. देवींची पहिली माळ जी नागवेलीच्या पानांची असते, ती माळ घटावर अर्पण केली जाते. घटस्थापनेनंतर मंदिर संस्थानच्या वतीने ब्राह्मणास पाठ, हवन व अनुष्ठानासाठी वर्णी दिली जाते.

------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२५

३




बीड : प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव देशमुख व मंडळातील सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत गणेशपार सार्वजनिक दुर्गाउत्सव मंडळ यांच्यावतीने गणेशपार येथे मोठ्या थाटामाटात दुर्गामातेच्या मूर्तीचे स्थापना करण्यात आली.

## थोडक्यात...

### माजी मंत्री क्षीरसागर यांच्या मोठ्या भगिनी श्रीमती पुष्पाताई पांगारकर यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मोठ्या भगिनी श्रीमती पुष्पाताई श्रीधरराव पांगारकर यांचे सोमवार दि.२२ रोजी प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्या ७९ वर्षाच्या होत्या.माजी नगरसेवक सुनिल पांगारकर आणि डॉ.गणेश पांगारकर यांच्या मातोश्री श्रीमती पुष्पाताई श्रीधरराव पांगारकर या काही महिन्यांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर बीड येथेच उपचार सुरू होते. सोमवार दि.२२ रोजी पहाटेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात दोन मुलं, पाच मुली, सुना नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर सोमवारी बार्शी रोडनजीक श्री भगवान बाबा प्रतिष्ठान जवळील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करणयात आले. श्रीमती पुष्पाताई या स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या बरोबरच, राजकीय. धार्मिक. सामाजिक आणि सांप्रदायिक कार्यक्रमात सहभागी असायच्या त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### ओला दुष्काळ जाहीर करावा – ॲड. हात्ते



तलवाडा । प्रतिनिधी

सध्या बीड जिल्ह्यात झालेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके पाण्याखाली गेली असून कापूस, सोयाबीन, मूग, उडीद, भाजीपाला यांसारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. परिणामी बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस ड. सुरेशराव हात्ते यांनी आपल्या सरकारकडे केली आहे.

### पुरामध्ये चाळीस लाखाचे सामान वाहून गेले

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील दादेगाव येथील युवक शरद फाळके यांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतले शिक्षण घेऊनही नोकरी न लागल्याने वडिलांनी शेतीमध्ये काबाडकष्ट करून साठवून ठेवलेली पुंजी व बँकांचे कर्ज घेऊन कडा येथे आदिनाथ लाईट इंडस्ट्रीज हा व्यवसाय सुरू केला होता. या दुकानांमध्ये घरातील लाईट फिटिंगचे सर्व साहित्य होलसेल दराने मिळत होते. त्यामध्ये फॅन झुंबर बल्प लाईट फिटिंग पाईप बटन बोर्ड वायर



विजेचे फोकस आधी मटेरियल मोठ्या प्रमाणात होते. सोमवारी सकाळी कडी नदीला महाप्रलयकारी पूर आल्याने हे पुराचे पाणी दुकानात घुसले आणि पाहता पाहता संपूर्ण दुकान या पुराचा बळी ठरले. तब्बल १२ तासानंतर पूर ओसरल्यानंतर दुकान उघडले असता दुकानांमध्ये सर्व साहित्य वाहून गेल्याचे विदारक चित्र पहावयास मिळाले. नवीनच व्यवसायात उतरलेल्या युवकाच्या स्वप्नांचा पुराच्या पाण्यात चुरडा झाला आहे.

# शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठी लढत राहणार – जलनायक मयंक गांधी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ तालुक्यातील अनेक गावात अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले आहे. ऐन सणासुदीच्या दिवसांत अस्मानी संकट ओढवल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. अगोदरच तोट्याची शेती आणि त्यात होत्याचे नव्हते झाले आहे. पाण्याने शेतकऱ्यांची पिके गेली, वाहत्या पाण्यामुळे शेतातील मातीही गेली तर काही ठिकाणी शेतात दगड गोटे येऊन बसले आहेत. या सर्व नैसर्गिक आपत्तीचे बांधावर जाऊन वस्तुनिष्ठ पंचनामे करून त्यांना तत्काळ मदत करावी अशी मागणी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांनी तहसीलदार, परळी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. त्याचबरोबर उद्या बीडचे जिल्हाधिकारी आणि परवा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शेतकऱ्यांना मदत करण्याच्या अनुषंगाने भेट घेणार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न ऐकल्यानंतर ते जगतात कसे? असा मला प्रश्न पडला, माझी झोपच उडाली असून मी शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठी लढत राहणार असल्याचे जलनायक मयंक गांधी यांनी म्हटले आहे.

ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी मागील काही दिवसांत तालुक्यातील अनेक गावांना भेटी देऊन अतिवृष्टीची पाहणी केली. गावोगावी बैठका घेऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. संकटाच्या काळात आमच्या पाठीशी उभे राहून शेतकऱ्यांच्या



प्रश्नावर आवाज उठवण्याची विनंती शेतकऱ्यांनी केली होती. त्यावर सकारात्मकता दर्शवत शेतकऱ्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत घेऊन जाण्याचे अभिवचन दिले होते. सर्व शेतकऱ्यांना एकत्र घेऊन परळीचे तहसीलदार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ज्यामध्ये १)प्रत्यक्ष नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करण्यात यावेत त्यांच्या नुकसानी नुसार १००% मदत करण्यात यावी. २)दिनांक १५/०९/२०२५ रोजी झालेल्या आतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये मदत करण्यात यावी. ३) पशुधनाचे तसेच इतर संसाधनाचे त्यामध्ये, विहीर, बोर पाईप लाईन, ठिबक, किंवा इतर तत्सम जीवितहानीचे सर्वे करून बाधित शेतकऱ्यांना १००% मदत करण्यात यावी. ४) गावाला व शेताला जोडणारे रस्ते, वीज खंडित झाले असून त्यांचे सर्वे करून तात्काळ सुरळीत करून देण्यात यावे. ५)पाण्याने वाहून गेलेल्या जमिनीचे पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना मदत दिली तरी त्या जमिनीची पोटखराब क्षेत्र म्हणून ७/१२ वर नोंद करण्यात येऊ नये. असे झाल्यास त्या शेतकऱ्यांना मिळणारे पुढील सर्व लाभ बंद होतील असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आलेले पाच प्रमुख मागण्यांचे निवेदन तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी स्वीकारले. यावेळी शेकडो शेतकऱ्यांची उपस्थिती होती. उपस्थितांनी जय जवान, जय किसान भारत माता की जय अशा घोषणा दिल्या.

### बुधवारी मुख्यमंत्र्यांना भेटणार

अतिवृष्टीने तर शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले आहेच. नैसर्गिक आपत्तीबरोबरच अनेक समस्या आहेत. संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी कोणीच उभे टाकत नाही. परळी वैजनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विनंतीवरून त्यांच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी मी सर्वांना सोबत घेऊन पुढील काळात संघर्ष करणार आहे. आज प्रशासनाकडे ज्या मागण्या केल्या आहेत त्या मागण्या आणि इतरही काही प्रश्नांची सोडवणूक करून घेण्यासाठी मी बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईमध्ये भेट घेणार असल्याचे मयंक गांधी यांनी उपस्थितांना म्हटले आहे.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आमदार सुरेश धस यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

मुंबई । प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघासह बीड जिल्ह्यात दिनांक १४, १५, १६ सप्टेंबर तसेच काल झालेल्या प्रचंड पावसामुळे आणि पुरपरिस्थितीमुळे शेतजमिनींचे व व्यापाऱ्यांचे अभूतपूर्व नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन तातडीने मदत व पुनर्वसन कायद्यात उपाययोजना करण्यासाठी साकडे घातले आहे. मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की,'' पुरामुळे मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. शासन निर्णयानुसार सध्या मिळणारी ४७ हजार रुपयांची मदत अत्यंत अपुरी असून शेतजमिनी पुन्हा तयार करण्यासाठी हेक्टरी किमान दहा लाख रुपये लागणार आहेत. त्यामुळे केंद्र शासनाच्या मनरेगा योजनेंतर्गत अंतर्गत प्रति हेक्टर पाच लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात यावे,'' अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

या शिवाय नदीपात्र बदलल्याने हजारो शेतकऱ्यांच्या विहिरी बुजल्या असून, २०१४-१५ मध्ये दिल्या गेलेल्या मदतीच्या धर्तीवर प्रति विहीर तीन लाख रुपयांचे अनुदान द्यावे किंवा नवीन विहिरीस मंजुरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच पुरामुळे वाहून गेलेल्या इलेक्ट्रिक मोटारी, सोलर पंप, ठिबक सिंचन व्यवस्था, कांदा चाळी, पाईपलाईन आदी घटकांना मदत व पुनर्वसन कायद्यात समाविष्ट करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुरामुळे व्यापाऱ्यांचेही कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून, त्यांना देखील आधार देण्यात यावा, अशी मागणी आमदार धस यांनी केली. त्याचबरोबर आष्टी मतदारसंघातील सुमारे ३०० ट्रान्सफॉर्मर्स वाहून गेल्याने विद्युत पुरवठा विस्कळीत झाला असून, हे ट्रान्सफॉर्मर्स तातडीने बसवावेत जेणेकरून आगामी पेरणीसाठी शेतकऱ्यांना पाणीपुरवठा सुरळीत होईल,या बाबीकडेही त्यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.केवळ दुष्काळ जाहीर करून उपयोग नाही, तर शेतकऱ्यांना आणि नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा देण्यासाठी तातडीचे व ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे.या सर्व मागण्यांवर मुख्यमंत्री महोदयांनी लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले असल्याची माहिती आमदार सुरेश धस यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना दिली.

## बालाघाटावरील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान; सरसकट मदत करावी -रसाळ

मांजरसुंबा बीड तालुक्यातील बालाघाटावर मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने ओला दुष्काळ जाहीर करत सरसकट मदत करावी अशी मागणी बालाघाट बीड तालुका भाजपाचे अध्यक्ष अशोक रसाळ यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



यावर्षी मे महिन्यापासूनच सुरू झालेल्या पावसामुळे व सध्या सुरू असलेल्या एक महिन्यापासूनच्या पावसामुळे बालाघाटावरील गावांची परिस्थिती अतिशय वाईट झाली आहे शेती तर या दोन-तीन दिवसातल्या पावसामुळे वाहून गेले आहे हाता तोंडाशी आलेले पीकेही वाहून गेले आहेत पिकासोबत गावांमध्ये पाणी शिरल्यामुळे घरांचेही नुकसान झाले आहेत काही ठिकाणी गुरे ढोरे वाहून जाऊन पावसामुळे मृत्यू ही पावले आहेत गावातील घरांची दुरावस्था झाली आहे अशा घरांचे तात्काळ पंचनामे करून मदत जाहीर करावी या अतिवृष्टीमुळे अनेक गावांचा पुले रस्ते वाहून गेल्यामुळे संपर्क तुटला आहे या परिस्थितीमध्ये नागरिकांना सरसकट शेतीसाठी मदत जाहीर करावी व घरादारांचे नुकसान झाले आहे त्यांना पंचनामे करून तात्काळ मदत शासनाने जाहीर करावी असे बीड भाजपा तालुका अध्यक्ष अशोक रसाळ यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे शासनाकडे मागणी केली आहे

# बोराडे यांच्या उपोषणाला बीडमध्ये धनगर समाजाकडून पाठिंबा

**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने ,धनगर समाजाने सरकार विरुद्ध केला संताप व्यक्त,चालण्यात २४ सप्टेंबरला होणार विराट मोर्चा**

बीड । प्रतिनिधी

जालना येथे दीपक बोराडे यांनी धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासाठी गेल्या सहा दिवसापासून आमरण उपोषण सुरू केले असून या उपोषणाकडे अद्याप पर्यंत सरकारने लक्ष दिले नसल्याने महाराष्ट्रात धनगर समाजाचा आरक्षणासाठी संताप व्यक्त होत असून महाराष्ट्रातील जिल्हा तालुका स्तरावर जालना येथील उपोषणाच्या समर्थनार्थ जिल्हाधिकारी तहसीलदार यांना निवेदन सादर करून समर्थन देण्यात येत आहे त्याच प्रकारे बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर सकल धनगर समाजाच्या वतीने उपोषणाला पाठिंबा दर्शवत जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन करण्यात आला यावेळी जिल्ह्यातील धनगर समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

गेल्या ७० वर्षापासून धनगर समाजाला एसटी आरक्षणापासून




वंचित ठेवण्याचे काम तत्कालीन महाराष्ट्र सरकारच्या वतीने वारंवार करण्यात येत असून यामुळे धनगर समाज एसटी आरक्षणापासून वंचित राहिलेला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आमचे सरकार आल्यास पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाला एसटीचे आरक्षण देऊ असे आश्वासन दिले होते मात्र हे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण केले नसल्याने धनगर समाजामध्ये देवेंद्र फडणवीस व भाजप विरुद्ध मोठी संतापाची लाट निर्माण झाली आहे त्याच अनुषंगाने जालना येथे एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी दीपक बोराडे यांनी १७ सप्टेंबर पासून आमरण उपोषणास सुरुवात केली असून या उपोषणाचा आजचा सहावा दिवस अद्याप पर्यंत शासनाने त्यांच्या उपोषणाची कुठलीही दखल घेतली नाही दीपक बोराडे यांची तब्येत खालावत चालली असून धनगर समाजामध्ये चिंता व संताप व्यक्त केला जात आहे या उपोषणाला अनेक लोकप्रतिनिधींनी आतापर्यंत भेट देऊन धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासाठी जाहीर पाठिंबाही देण्यात येत आहेत जालन्यात सध्या धनगर समाज मोठ्या संख्येने जमा होत असून महाराष्ट्रातील धनगर समाज चालण्याकडे धावत असल्याचे दिसून येत आहे. त्याच अनुषंगाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकल धनगर समाजाच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली व जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून आपला संताप व्यक्त करण्यात आला. गणेश कोळेकर प्राध्यापक भगवान माने एडवोकेट राजू शिंदे राहुल कोळेकर सतीश खरात प्राध्यापक प्रकाश देशमुख प्राध्यापक गवळी एम के आप्पा परळीकर अभिजीत शिंदे , ईश्वर वाघमोडे,अविनाश काकडे अण्णासाहेब मतकर विष्णू देवकते अशोक गावडे अशोक पांढरे भास्कर जाधव राजेंद्र गाडेकर अंकुश गणेश ढवळे बाळासाहेब मोरे बाबासाहेब सापणकर अंकुश ढेंबरे प्राध्यापक वैजनाथ दिंडोळे सारंग खरात निलेश वाघमोडे गोवर्धन गोरे प्रतीक माने बिराजदार अण्णा प्रकाश देशमुख,अमर वाघमोडे, अंकुश गवळी, सह आधी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### २४ तारखेला जालन्याला मोठ्या संख्येने जाणार

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासाठी दीपक बोराडे यांनी जालना येथे सहा दिवसापासून आमरण उपोषण सुरू केले असून हा उपोषणाचा लढा अंतिम टप्प्यात आला आहे. अनुषंगाने २४ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रातील होणार असून जाळण्यात धनगर समाजाच्या विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या मोर्चाला बीड जिल्ह्यातून लाखो धनगर बांधव सहभागी होणार असल्याचे यावेळी समन्वयकांनी सांगितले.

## महाराष्ट्र लोकसेवा गट ब परीक्षेत आष्टीचा डंका ; निखिल हंबर्डे राज्यातून दुसरा

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा गट ब परीक्षेत आष्टीचा डंका वाजला असुन निखिल रमाकांत हंबर्डे हा राज्यातून दुसरा आला आहे. सहाय्यक कक्ष अधिकारी,राज्य कर निरीक्षकपदी निवड झाली आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (चझडउ) नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात आष्टी येथील सुपुत्र निखिल पुष्पा रमाकांत हंबर्डे यांनी दैदिप्यमान यश मिळवले आहे. त्यांनी सहाय्यक कक्ष अधिकारी (मंत्रालय) आणि राज्य कर निरीक्षक या दोन्ही अत्यंत प्रतिष्ठेच्या पदांसाठीच्या परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून दुसरा क्रमांक पटकावला आहे.



निखिल हा आष्टी येथील जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता रमाकांत हंबर्डे यांचे चिरंजीव आहेत तर साप्ताहिक 'आष्टी चित्रदर्शन'चे संपादक अनंत हंबर्डे यांचे नातू आहेत. एका अभ्यासू आणि प्रतिष्ठित घराण्याचा वारसा त्यांनी आपल्या कर्तृत्वाने पुढे नेला आहे. निखिलच्या या नेत्रदीपक यशामुळे त्यांच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे.निखीलच्या या यशाबद्दल सर्व नातेवाईक, मित्रमंडळी आणि समाजातील सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. निखलच्या या यशाबद्दल आ.सुरेश धस,माजी आ. साहेबराव दरेकर, जेष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे यांनी निखिल यांचे अभिनंदन केले आहे.निखिलने मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील इतर तरुणांसाठी एक मोठे प्रेरणास्थान ठरले आहे.महाराष्ट्र लोकसेवा गट ब परीक्षेत निखील राज्यात व्दितीय आला आहे. निखीलचे प्राथमिक शिक्षण जि.प.प्रा. शाळा आष्टी,५ वी.ते १० वी.पर्यत पंडीत जवाहरलाल नेहरु विद्यालयात नंतर लातुर येथील दयानंद महाविद्यालयात ११ वी.व १२ वी.पर्यंत शिक्षण घेतले आहे.बारावीला ९५ टक्के गुण मिळवुन विशेष यश प्राप्त केले होते.पुणे येथील सीओईपी इंजिनियरींग कालेजमधुन इंजिनियरींग पदवी मिळवली होती.दोन वर्षे इमरसन्स कंपनीत जाब केला आहे. दरम्यान ही महाराष्ट्र लोकसेवा गट ब परीक्षा दिली होती, या परीक्षेत घवघवीत यश संपादन करुन राज्यात व्दितीय क्रमांक पटकावला आहे.निखीलच्या या यशाबद्दल नातेवाईक व मित्रपरिवाराकडुन अभिनंदन होत आहे.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-२९९ दिनांक-१९/०९/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती ईश्वर लिंबाजी बाबर रा.अंबड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मनिषा ईश्वर बाबर | मुलगी | १७/०५/२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-१९-९-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-५६ दिनांक-२५/०६/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती लोभा गोपाळ राठोड रा.साडेगाव ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विपुल लोभा राठोड | मुलगा | १२/०८/२००० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२५-६-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-४९९ दिनांक-१९/०९/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मच्छिंद्र दगडू मिसाळ रा.भार्डी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कृष्णा मच्छिंद्र मिसाळ | मुलगा | २९/०९/२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १९/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-४७७ दिनांक-२२/०९/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती गणी उस्मान शेख रा.गंगाचिंचोली ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गणी उस्मान शेख | स्वत: | ०१/०१/१९५१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २२/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# देशातील काही बाजारांत नव्या कापसाच्या आवकेला सुरुवात

## सध्याचा भाव हमीभावापेक्षा खूपच कमी असल्याने शेतकऱ्यांना भाव वाढण्याची अपेक्षा

पुणे : देशातील काही बाजारांत नव्या कापसाची आवक सुरु झाली आहे. हरियाना, पंजाब, कर्नाटक, तेलंगणात काही बाजारांमध्ये नवा कापूस दाखल झाला. पण आवक अजून वाढलेली नाही. लवकर लागवड झालेला कापूसच सध्या वेचणीच्या टप्प्यात आला आहे. त्याचे प्रमाणही कमी आहे. तसेच या कापसात ओलावा अधिक असल्याने तो प्रति क्विंटल ६५०० रुपयांच्या दरम्यान विकला जात आहे. सरकारने यंदा मध्यम लांब धाग्याच्या कापसासाठी ७७१० रुपये तर लांब धाग्याच्या कापसासाठी ८११० रुपये हमीभाव जाहीर केला. सध्याचा भाव हमीभावापेक्षा खूपच कमी आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातही कापसाचे भाव दबावात आहेत. तसेच सरकारने कापूस आयातीवरील शुल्क काढले आहे. त्यामुळे देशात कापसाचे भाव जास्तच दबावात आले आहेत. कापूस दरावरील दबाव कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना यंदा हमीभावाने कापूस विक्रीचा पर्याय फायदेशीर ठरू शकतो. शेतकऱ्यांनी हमीभावाने कापूस विक्रीसाठी नोंदणी करावी, असे आवाहन देखील अभ्यासक करत आहेत. ऑक्टोबरपासून बाजारात कापसाची आवक वाढत जाईल. तर दुसरीकडे बाजारभाव दबावातच राहतील. त्यामुळे सीसीआयला यंदा मोठ्या प्रमाणात कापूस खरेदी करावा लागणार आहे. तशी तयारीदेखील सीसीआय करत आहे. यंदा १५० लाख गाठींच्या दरम्यान खरेदीची तयारी करत असल्याचे सीसीआयने स्पष्ट केले आहे.



नव्या हंगामात जास्त खरेदी करावी लागू शकते म्हणून सीसीआयने २०२४-२५ मधील सर्व कापूस विक्रीचे नियोजन केले आहे. सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला सीसीआकडे २७ लाख गाठी कापूस होता. सरकारने कापूस आयात शुल्क काढल्यापासून सीसीआयने कापूस विक्रीचे भाव २ हजाराने कमी केले होते. तसेच १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर दरम्यान कापूस विक्रीसाठी आणखी ४०० ते ६०० रुपयांनी भाव कमी केले. त्यामुळे या १५ दिवसांमध्ये सीसीआयने १५ लाख गाठी कापूस विकला. त्यानंतर सीसीआयकडे १२ लाख गाठी कापूस शिल्लक होता. हा कापूसही ३० सप्टेंबरपर्यंत विकण्याचे सीसीआयने उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी कमी केलेले भाव कायम ठेवले आहेत.

सीसीआय यंदा तीन टप्प्यात खरेदी करणार आहे. देशभरात ५५० खरेदी केंद्रे सुरु होतील. त्यापैकी १५० खरेदी केंद्रे महाराष्ट्रात असतील. पंजाब, हरियाना, राजस्थानमध्ये कापसाची लागवड लवकर होते. तसेच अनेक भागांत कापूस वेचण्याच्या टप्प्यात येत आहे. त्यामुळे या राज्यांमध्ये खरेदी १ ऑक्टोबरपासून सुरू होईल. तर महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेशात १५ ऑक्टोबरपासून खरेदी होणार आहे. तर तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटकात २१ ऑक्टोबरपासून खरेदी सुरु होईल. सीसीआय ८ ते १२ टक्क्यांच्या दरम्यान ओलावा असलेला कापूस खरेदी करते. मात्र सुरुवातीला कापसामध्ये ओलावा अधिक असतो. त्यामुळे सीसीआयने कापूस खरेदीचे नियम शिथिल करावे, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

देशात यंदा कापसाची लागवड ३ टक्क्यांनी कमी झाली. जवळपास १०९ लाख हेक्टरवर यंदा लागवड स्थिरावली आहे. महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये यंदा लागवड कमी झाली. तर उत्तर भारत आणि दक्षिण भारतात लागवड काहीशी अधिक आहे. ऑगस्ट महिन्यापर्यंत अनेक भागात पिकाची परिस्थिती चांगली होती. त्यामुळे देशात यंदा लागवड कमी झाली तरी कापसाचे उत्पादन गेल्या वर्षीपेक्षा जास्त राहील, असा अंदाज उद्योगांनी व्यक्त केला होता. मात्र सप्टेंबर महिन्यातही कापूस उत्पादक भागात कापूस पिकाला मोठ्या प्रमाणात पावसाने दणका दिला. पंजाब, हरियाना आणि राजस्थानमध्ये पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. उत्तर भारतात कापूस पीक बोंड भरण्याच्या आणि कापूस वेचणीच्या टप्प्यात पीक आहे. या पिकाचे नुकसान होत आहे. तसेच महाराष्ट्रातही गेले आठवडाभर पावसाने चांगलाच धुमाकूळ घातला. महाराष्ट्रात कापूस पीक फुले आणि बोंडे लागण्याच्या टप्प्यात आहे. त्यामुळे कापूस पिकाचे मोठे नुकसान होत आहे. गुजरातमध्येही पिकाचे नुकसान झाले. कर्नाटक, तेलंगणातही पावसाचा फटका बसला. त्यामुळे यंदा गेल्या वर्षीपेक्षा उत्पादन कमीच राहील, असा अंदाज अभ्यासक व्यक्त करत आहेत.

# बोंडअळीसाठी सापळा लावा आणि कीड आटोक्यात ठेवा



कपाशीवरील बोंड अळीच्या पतंगाची मादी नराला आकर्षित करण्यासाठी विशिष्ट प्रकारचा गंध सोडते. असा गंध कृत्रिमरीत्या तयार करून गोळ्याच्या स्वरूपात (ल्यूर) वापरला जातो. त्या प्लास्टिकच्या सापळ्यात पतंग अडकतात व याद्वारे गुलाबी बोंड अळीवर नियंत्रण मिळविता येते.

पिकातील किडीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. यामध्ये मशागत, कीड प्रतिकारक वाणाचा वापर यासह यांत्रिक, भौतिक, जैविक पद्धतींचा संयुक्तिक वापर केला जातो. किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळीच्या खाली ठेवण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांनी करणे महत्त्वाचे आहे. कीटकनाशकांचा मर्यादित आणि अचूक वापर केल्यास पिकांचे नुकसान टाळण्यासोबतच वातावरणाचा समतोल राखता येतो.

कामगंध सापळा म्हणजे काय ? कापसावरील बोंड अळ्यांचा मादी पतंग विशिष्ट प्रकारचा गंध आपल्या शरीराद्वारे सोडतात, नर पतंग त्याकडे आकर्षिले जातात. असे गंध कृत्रिमरीत्या तयार करून गोळ्यांच्या स्वरूपात सापळ्यात वापरले जातात. या गोळ्यांना ल्यूर अथवा सेप्टा म्हणतात, त्या प्लास्टिकच्या सापळ्याला कामगंध सापळे म्हणतात. गंधामुळे विजातीय पतंग सापळ्यात जातात आकर्षिले. पतंगवर्गीय कीटकांमध्ये मादी आणि नर यांचे मिलन होण्यासाठी एक विशिष्ट प्रकारचा गंध सोडला जातो. काही कीटकांच्या प्रजातींमध्ये नराद्वारे सोडलेल्या गंधाकडे स्वजातीय मादी आकर्षित होते, तर काहींमध्ये मादीद्वारे नराला आकषून घेण्यासाठी आपल्या शरीरातून गंध सोडते. अशा गंधामुळे विजातीय पतंग आकर्षिले जातात.

# अझोलाचे उत्पादन कसे करावे?

अझोला ही पाण्यात वाढणारी वनस्पती आहे. तिच्यामध्ये प्रथिने, जीवनसत्वे आणि खनिजे यासारखे पोषकतत्त्व असतात. अझोलाचे उत्पादन कमी जागेत आणि कमी खर्चात घेता येते त्यामुळे पशु आहारासाठी अझोला हा खूप चांगला पर्याय आहे.

अझोलाचे उत्पादन : अझोला शेवाळासारखी पाण्यावर तरंगणारी वनस्पती आहे. त्याची वाढही फार भराभर होते. साधारणत: अझोला तांदळाच्या शेतात किंवा उथळ पाण्याच्या जागी उगवता येतो.

बेडची बांधणी : जमीन सारखी व स्वच्छ करुन घ्यावी. आयताकार स्वरूपात विटा आडव्या रचाव्यात. विटांनी तयार करण्यात आलेल्या आयाताकाराच्या मार्जिनला झाकणारी २ मीटर बाय २ मीटर मापाची एक पातळ यूव्ही स्टॅबिलाइज्ड शीट टाकावी. १० ते १५ किलो चाळून बारीक माती सिल्प्यूलाइन पिटमध्ये टाकावी. त्यानंतर २ किलो शेणाची स्लरी तयार करावी. त्यात ३० ग्रॅम सुपर फॉस्फेट १० लिटर पाण्यात मिसळून, शीटवर टाकावे. पाण्याची पातळी १० सेमी. वाढविण्यासाठी आणखी पाणी टाकावे. त्यावर सुमारे ०.५ ते १ किलो शुध्द मदर अझोला बेड वर सर्वत्र पसरावा.

बेडचे नियोजन : २० ग्रॅम सुपर फॉस्फेट आणि सुमारे १ किलो गाईचे शेण ५ दिवसांत एकदा मिसळावे. ज्यामुळे अझोलाची लवकर वाढ आणि रोजची ५०० ग्रॅमची उपज कायम राहील. मायक्रोन्यूट्रिंट मिक्स यामध्ये मॅग्नेशिअम, लोह, तांबे, गंधक इत्यादी देखील आठवड्यातून एकदा मिसळावे म्हणजे अझोलातील खनिज घटकांची वाढ होईल. ३० दिवसांतून एकदा, सुमारे ५ किलो बेड माती नवीन मातीने बदलून टाकावी, यामुळे नत्राची वाढ आणि सूक्ष्मअन्नद्रव्यांची कमतरता यांच्यावर उपाय होईल. बेडमधील २५ ते ३० टक्के पाणी दर १० दिवसांनी बदलावे. बेड स्वच्छ ठेवावा. दर सहा महिन्यांनी पाणी व माती बदलावी आणि अझोला लावावा. जेव्हा कीटक किंवा रोग लागणे सुरु होईल तेव्हा अझोलाच्या शुध्द कल्चरने युक्त असा ताजा बेड लावावा. अझोलाच्या प्रायोगिक उत्पादनासाठी उच्च प्रतीच्या एच.डी.पी.इ. व एल.डी.पी.ई. यांच्या ५ थरांचे लॅमिनेशन करुन आय.एस.आय. मानांकनानुसार बनविलेल्या कापडातून बनविलेला हौद (बेड) बाजारात मिळतो.



०००

काढणी करणे :अझोलाची वाढ झपाट्याने होते. १०-१५ दिवसांत हौद भरून जातो. त्या वेळेपासून, ५००-६०० ग्रॅम अझोलाची काढणी दररोज होऊ शकते. १५ व्या दिवसापासून एखाद्या चाळणी किंवा ट्रेच्या मदतीने अझोला काढावे. काढणी केलेला अझोला ताज्या पाण्याने धुतल्यावर गाईच्या शेणाचा वास निघून जाईल.

वाढीसाठी पर्यावरण घटक : अझोला २०ते २८ सेल्सियसच्या तापमानात चांगला वाढतो. शिवाय ५० टक्के पूर्ण सूर्यप्रकाश असावा. सावलीची जाळी वापरुन प्रकाशाची तीव्रता कमी करता येईल. अझोलाची बेडमधील गर्दी टाळण्यासाठी अझोला बायोमास दररोज काढून जनावरांना खाऊ घालावा.

# शंखी गोगलगायींचे सामुहिकरीत्या एकात्मिक नियंत्रण

शेतकऱ्यांनी या गोगलगायींना वेळीच लक्ष देऊन सामुहिकरीत्या एकात्मिक उपाययोजना करणे गरजेचे आहे जेणेकरून पिकांचे होणारे नुकसान टाळता येईल. बऱ्याच भागात पाऊस पडल्यानंतर सुप्तावस्थेतील गोगलगायी बाहेर पडताना आढळून येते आहे, त्यामुळे उगवून आलेल्या सोयाबीन, कापूस यासारख्या पिकामध्ये तसेच फळ बागेमध्ये गोगलगायींचा प्रादुर्भाव वाढून मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी या गोगलगायींना वेळीच लक्ष देऊन सामुहिकरीत्या एकात्मिक उपाययोजना करणे गरजेचे आहे जेणेकरून पिकांचे होणारे नुकसान टाळता येईल, असे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राने केले आहे.

नियंत्रणात्मक उपाययोजना : सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्यात किंवा शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आत मध्येच मरून जातील. गोगलगायी जमा करताना अथवा हाताळणी करताना उघड्या हाताने न करता हातमोजे व तोंडावर मास्क घालूनच करणे गरजेचे आहे. शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर विविध ठिकाणी वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकाच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात



ठिकठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी. गोगलगायींना आकर्षित करण्यासाठी शेतात ठिकठिकाणी गोणपाट ओले करून त्यावर पत्ताकोबी अथवा पपई ची पाने बारीक करून ठेवावीत, त्याला आकर्षित होऊन जमा झालेल्या गोगलगायींवर तंबाखूचा अर्क ५ लिटर (२५० ग्रॅम तंबाखू भुकटी ७.५ लिटर पाण्यात उकळून ५ लिटर तयार झालेले द्रावण) + कॉपर सल्फेट म्हणजेच मोरचूद द्रावण ५ लिटर (३०० ग्रॅम कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात) असे एकूण १० लिटर द्रावण फवारावे, त्याच्या संपर्कात आल्याने गोगलगायी मरतात.

लहान शंखीच्या नियंत्रणासाठी १० टक्के मिठाची (१०० ग्रॅम प्रती १ लिटर पाणी) फवारणी फायदेशीर दिसून आली आहे. बोर्डो मिश्रण (१ किलो मोरचूद + १ किलो चुना १०० लिटर पाण्यात), कॉपर सल्फेट (३०० ग्रॅम १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड (२५ ग्रॅम १० लिटर पाण्यात) इत्यादीच्या फवारण्या गोगलगाय नियंत्रणासाठी नोंदणीकृत नाहीत, परंतु गोगलगाय नियंत्रणासाठी किंवा त्यांना परावृत करण्यासाठी फळबागेत काही प्रमाणात परिणामकारक आहेत.

गोगलगायीच्या नियंत्रणासाठी मेटाल्डिहाईड दाणेदार या गोगलगायनाशकाचा वापर करावा. कापसासारख्या पिकामध्ये दाणेदार मेटाल्डिहाईड २ किलो प्रति एकरी या प्रमाणात शेतात पसरून द्यावे. तर फळबागेमध्ये झाडाखाली दाणेदार मेटाल्डिहाईड प्रति झाड १०० ग्रॅम पसरून टाकावे. शंखी गोगलगाय प्रामुख्याने पपईची रोपे व झेंडूच्या रोपांकडे आकर्षित होतात. म्हणून मेटाल्डिहाईडच्या गोळ्या पपईच्या पिवळ्या पानांजवळ ठेवतात. त्यामुळे त्या लवकर आकर्षित होऊन मोठ्या प्रमाणात मरतात. मेटाल्डिहाईड चा वापर, जास्त तापमान व कमी आर्द्रता असते अशावेळी जास्त प्रभावी दिसून येतो. जर हे आमिष उपलब्ध न झाल्यास, पुढील प्रकारे आमिष तयार करून बागेमध्ये टाकून घ्यावे. दहा लिटर पाण्यामध्ये दोन किलो गूळ अधिक २५ ग्रॅम यीस्ट यांचे द्रावण तयार करावे. हे द्रावण ५० किलो गव्हाच्या अथवा भाताच्या कोंड्यात टाकून चांगले मिसळावे. १० ते १२ तास हे मिश्रण आंबविण्यासाठी ठेवावे. त्यानंतर त्यामध्ये थायामिथोक्झाम २५ टक्के ५० ग्रॅम चांगल्या प्रकारे मिसळावे. हे आमिष शेतामध्ये ढिगाच्या स्वरुपात किंवा बांधाच्या कडेने पट्टा स्वरुपात टाकावे. सदरील आमिषा पासून पाळीव प्राणी, लहान मुलांना दूर ठेवावे. वरील गोगलगायनाशक अथवा अमिषाचा वापर प्लॅस्टिक हातमोजे घालूनच काळजीपूर्वक करावा. अशाप्रकारे शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव ज्या भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत असेल त्या भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या वरील प्रमाणे उपाय योजना सुरवातीपासूनच केल्यास गोगलगायीचे नियंत्रण अधिक प्रभावीपणे होते.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१६४१ : साली सहा हजार करोड पेक्षा जास्त सोन्या चांदीने भरलेला रॉयल मर्चंट जहाज इंग्लंडच्या दक्षिणी पश्चिमी समुद्री भागात बुडाला.
१८०३ : दुसरे इंग्रज-मराठा युद्ध: ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि भारतातील मराठा साम्राज्य यांच्यातील अश्तेची लढाई.
१८४६ : अर्बेन ली व्हेरिअर व त्याच्या २ सहकार्यांनी नेपच्यून ग्रहाचा शोध लावला. गणिती आकडेमोड करुन शोध लागलेला हा पहिला ग्रह आहे.
१८७३ : महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.
१८८४ : महात्मा फुलेंचे सहकारी रावबहादूर नारायण लोखंडे यांनी बाँबे मिल हँड्स असोसिएशन ही गिरणी कामगार संघटना स्थापन केली.
१८८९ : साली विडियो गेम बनविणारी अमेरिकन विश्व प्रसिद्ध कंपनी निनट्याडो ची स्थापना करण्यात आली.
१९०५ : आधी एकत्र असलेल्या नॉर्वे व स्वीडन यांनी 'कार्लस्टॅड' कराराद्वारे अलग होण्याचा निर्णय घेतला.
१९०८ : कॅनडातील 'युनिव्हर्सिटी ऑफ अल्बर्टा' ची स्थापना
१९३२ : हेझाझ आणि नेजडचे राज्य यांना सौदी अरेबियाचे राज्य नाव देण्यात आले.
१९८३ : 'सेंट किट्स आणि नेव्हिस'चा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९२ : भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस इंद्रजित गुप्ता ''उत्कृष्ट संसदपटू'साठीचा ''गोविंद वल्लभ पंत पुरस्कार' पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या हस्ते प्रदान.
२००२ : 'मोझिला फायरफॉक्स' या ब्राउजरची पहिली आवृत्ती प्रकाशित करण्यात आली.
२००३ : भारतीय वंशाच्या मीरा नायर यांची आशिया अमेरिकी साहित्य पुरस्कारासाठी निवड. त्यांच्या ''व्हीडिओ : स्टोरीज' या पुस्तकात स्थलांतराबाबतच्या अनुभवांचे कथन करण्यात आले आहे.
२००४ : योकोहामा (जपान) येथील मैदानी स्पर्धेत भारताच्या अंजू जॉर्जने रशियाची ऑलिंपिक विजेती तात्याना लेबेदेवाचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२१५ : कुबलाई खान मंगोल सम्राट (मृत्यू: १८ फेब्रुवारी १२९४)
१७७१ : जपानी सम्राट कोकाकु यांचा जन्म.
१८६१: रॉबर्ट बॉश जर्मन अभियंते आणि उद्योजक (मृत्यू: १२ मार्च १९४२)
१९०३ : युसूफ मेहेर अली समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक व मुंबईचे महापौर (मृत्यू: २ जुलै १९५०)
१९०८ : रामधारी सिंह 'दिनकर' देशभक्त व हिन्दी साहित्यिक (मृत्यू: २४ एप्रिल १९७४). भागलपूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. केंद्रीय गृहमंत्रालयाचे ते हिंदी भाषाविषयक सल्लागार होते.
१९११ : भारतीय भौतिकशास्त्रज्ञ राप्पल संगमेश्वर कृष्णन यांचा जन्म. त्यांचे प्रमुख संशोधन प्रकाशाचे विखुरणे, वर्णपट विज्ञान, स्फटिकभौतिकी व अणुकेंद्रीय भौतिकी या शाखांतील आहे. त्यांनी एका नवीन प्रकाशकीय परिणामाचा शोध लावला व सैद्धांतिकरीत्या त्याचे व्यापक स्वरूप प्रस्थापित केले. या परिणामाला ''कृष्णन परिणाम' असे नाव प्राप्त झाले आहे.
१९१४ : ब्रुनेईचा राजा ओमर अली सैफुद्दीन (तिसरा) यांचा जन्म.
१९१५ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ क्लिफर्डशुल यांचा जन्म.
१९१७ : साली भारतीय सेंद्रिय रसायनशास्त्री असीमा चटर्जी यांचा जन्मदिन.
१९१९ : देवदत्त दाभोळकर पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, शिक्षणतज्ञ, गांधीवादी व समाजवादी (मृत्यू: १७ डिसेंबर २०१०). त्यांची ''अ पायलट सर्व्हे ऑफ शिरुर तालुका ॲग्रो इंडस्ट्रिअल बॅलन्स', ''क्लाइंबिंग अ वॉल ऑफ ग्लास', ''सरदार सरोवर डिबेट', ''ओ नर्मदा' इ. अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.
१९२० : प्रा. भालचंद्र वामन तथा 'भालबा' केळकर नाट्यकला, विज्ञान, अध्यात्म या सर्व क्षेत्रंत सारख्याच अधिकाराने वावरणारे सव्यसाची व्यक्तिमत्त्व, प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष, हौशी प्रायोगिक रंगभूमीचे अध्वर्यू, लेखक, अभिनेते, दिग्दर्शक (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९८७).
१९३५ : साली प्रसिद्ध भारतीय हिंदी आणि पंजाबी चित्रपट अभिनेता प्रेम चोपडा यांचा जन्मदिन.
१९४३ : तनुजा चित्रपट अभिनेत्री
१९५० : गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय वैद्यकीय सेवाकार्य करणारे डॉ. अभय बंग यांचा जन्म. त्यांना ''महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले.
१९५२ : अंशुमान गायकवाड क्रिकेटपटू
१९५७ : कूमार सानू पार्श्वगायक

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : ग्रँट डफ मराठ्यांचा इतिहास लिहीणारा ब्रिटिश अधिकारी (जन्म: ८ जुलै १७८९)
१८६३ : साली ब्रिटीश कालीन भारतातील पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाच्या वेळी हरियाणा येथील बंडाचे नेतृत्व करणारे महान क्रांतिकारक राव तुलाराम सिंह यांचे निधन.
१८७० : प्रॉस्पर मेरिमी फ्रेंच कथालेखक, नाटककार, इतिहासकार आणि पुरातत्त्वज्ञ (जन्म: २८ सप्टेंबर १८०३)
१८८२ : फ्रेडरिक वोहलर जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ३१ जुलै १८००)
१९३९ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (जन्म: ६ मे १८५६)
१९६४ : भार्गवराम विठ्ठल तथा 'मामा' वरेरकर (जन्म: २७ एप्रिल १८८३). सत्तेचे गुलाम, करीन ती पूर्व, हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार आदी नाटके त्यांनी लिहिली. रवींद्रनाथ टागोर, शरच्चंद्र चट्टोपाध्याय, जेम्स बॅरी, हेन्रिक इब्सेन, विल्यम बॅरेट यांच्या साहित्यकृतींचे मराठी अनुवाद त्यांनी केले. विधवाकुमारी, संसार की संन्यास, धावता धोटा या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांना सरकारने ''पद्मविभूषण' सन्मान प्रदान केला होता.
१९९९ : मराठी चित्रपट, जाहिरातपट निर्माते गिरीश घाणेकर यांचे निधन.
२००४ : डॉ. राजा रामण्णा शास्त्रज्ञ, अणुऊर्जा आयोगाचे ४ थे अध्यक्ष (जन्म: २८ जानेवारी १९२५)
२०१२ : कांतिलाल गिरीधारीलाल व्होरा ऊर्फ के. लाल जादूगार (जन्म:१९२४)
२०१५ : भारतीय संन्यासी आणि तत्त्वज्ञ दयानंद सरस्वती यांचे निधन. (जन्म: १५ ऑगस्ट १९३०)

cmyk
cmyk

# शासनाने धनगरांना संवैधानिक एसटीचे आरक्षण द्यावे - ॲड. सदावर्ते

## आ.कुचे, आ. पंडित यांचा दिपक बोऱ्हाडे यांच्या उपोषणास पाठिंबा

जालना । प्रतिनिधी

इंग्रजांच्या काळातील क्रिमिनल ट्राईब मध्ये असलेला आदिवासी धनगर समाज संविधानिक दृष्ट्या अनुसूचित जमातीत असून शासनाने धनगर समाजाला एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करुन सत्याच्या मार्गाने उपवास धरून आमरण उपोषणास बसलेले दिपक बोऱ्हाडे यांचा जीव वाचवावा अशी मागणी ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

राष्ट्रमाता, महाराणी, अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारक स्थळी पाच दिवसांपासून आमरण उपोषणास बसलेले दिपक बोऱ्हाडे यांच्या उपोषण स्थळी रविवारी बदनापूरचे आ. नारायण कुचे, गेवराईचे आ.विजयसिंह पंडित,ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी भेट देऊन पाठिंबा दिला.



ॲड. गुणरत्न सदावर्ते यावेळी बोलतांना म्हणाले, आजही उन्हा-तानात, राना-वनात भटकत असणारे मेंढपाळ हाच आदिवासी असल्याचा पुरावा असून सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती जर्नल सिंग यांच्या पीठाने दिलेल्या निकालात '' अनुसूचित जाती-जमाती वर्गांचे मागासले पण तपासण्याची गरज नाही'' असे स्पष्टपणे नमूद केले आहे. अशी माहिती सदावर्ते यांनी दिली. देशाचे संविधान, सर्वोच्च न्यायालय धनगर बांधवांसोबत असून समाज बांधवांनी कायदा हातात न घेता कायदेशीर लढाई लढावी यासाठी आपण सोबत आहोत. डंके की चोट पर धनगर समाजाला एसटीचे आरक्षण मिळेल असे नमूद करत राजकारण्यांनी आरक्षण लढाईचे राजकारण न करता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, ना. महाजन यांनी तातडीने यंत्रणा हलवावी आणि धनगर समाजास एसटीचे प्रमाणपत्र द्यावे अशी मागणी सदावर्ते यांनी केली.

दिपक बोऱ्हाडे यांनी संविधानाच्या कलम ३६ मध्ये आमचा अमृताचा कलश आहे. माझा श्वास चालू असेपर्यंत आम्हाला आरक्षणाचा आनंद घेऊ द्या नसता श्वास थांबल्यानंतर धनगर समाज बांधवांनी पेटून उठावे, तुम्हाला फसवणाऱ्यांची घरे जाळून टाका असे आवाहन बोऱ्हाडे यांनी केले. यावेळी राज्यभरातून आलेल्या महिला, मुले, युवक -युवती आणि धनगर समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### अंबड जिंतूर तालुक्यांतून वाहनांचा ताफा...!

धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी मागील पाच दिवसांपासून आमरण उपोषणास बसलेले दीपक बोऱ्हाडे यांना पाठिंबा देण्यासाठी दररोज राज्यातील कानाकोपऱ्यातून समाज बांधव येत असून आज पाचव्या दिवशी अंबड तालुक्यातील ५०० तर जिंतूर तालुक्यातील ३०० वाहनांच्या ताफ्यासह धनगर समाज बांधव दाखल झाले. यात महिला व लहान मुलांची लक्षणीय उपस्थिती होती.

# पोलीस मुख्यालयात २ हजार वृक्षांची लागवड

## पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम



जालना । प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत पोलीस मुख्यालय, जालना येथे २० सप्टेंबर रोजी २ हजार झाडांची लागवड करण्यात आली. हा उपक्रम जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

या वृक्षारोपण कार्यक्रमात पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. या कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, पोलीस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी, पोलीस उपअधीक्षक, गृह विभाग रवींद्र निकाळजे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा पंकज जाधव, पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण विभाग सिद्धार्थ माने, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा रायत्तुवार, राखीव पोलीस दलाचे श्री वाघ, स्थानिक गुन्हे शाखेचे संजय सोनवणे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# जामखेड तालुक्यात परतीच्या पावसाचा धुमाकूळ

## अनेकांचे शेत गेलं वाहून



जामखेड । प्रतिनिधी

शहरासह तालुक्यात परतीचा पाऊस धुमाकूळ घालत आहे. दुष्काळी भागात ढगफुटीसदृश पाऊस झाला आहे. सलग दोन दिवस झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. उभ्या पिकासह शेतच वाहून गेल्याच्या घटना तालुक्यातील विविध गावात घडल्या आहेत.

अनेक ठिकाणी ऊस अक्षरशः झोपला असून शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. प्रशासनाने सरसकट पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा आणि आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. जून ते सप्टेंबर महिन्यादरम्यान मान्सूनचा पाऊस पडतो. या तीन महिन्यातील पावसावरच वर्षभराचे शेती तसेच पिण्याच्या पाण्याचे गणित अवलंबून असते. यावर्षी आतापर्यंत तालूक्यात चांगला पाऊस झालेला आहे. त्यामुळे पाझरतलाव, बंधारे भरुन वाहत आहेत. सततच्या पावसामुळे वर्षभराची चिंता मिटलेली आहे. अशातच आता परतीचा पाऊस सुरू झाला आहे. यामुळे धो-धो पाऊस होत आहे. या दुष्काळी तालुक्यातच परतीचा जोरदार पाऊस पडतो. सप्टेंबर ते ऑक्टोबरचे काही दिवस असा हा पाऊस असतो; पण क्षणातच धो-धो पाऊस पडत असल्याने ओढे, नाले भरून वाहतात. तलावांत पाणीसाठा होता. सध्या अशीच स्थिती या तालुक्यात होऊ लागली आहे. यामुळे शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण तयार झालेले आहे. कारण, खरीप हंगामातील पिके काढणीस असताना पिके वाया गेली आहेत दि १९ पासून मुसळधार पाऊस झाला. यामुळे क्षणातच सर्वत्र पाणीच पाणी झाले. अनेक रस्त्यावर पाणी आले. यामुळे हे रस्ता वाहतुकीसाठी तात्पुरता बंद करण्यात आला आहे. वाहनधारक तसेच परिसरातील अनेक गावांना याचा फटका बसणार आहे.या परतीच्या पावसामुळे तालुक्यात पावसाचा धुमाकूळ वाढू लागल्याचे चित्र आहे.

# तीन सख्ख्या बहिणींवर नातेवाईकच २०२० पासून करत होता बलात्कार

## अहिल्यानगरमधील संतापजनक घटना

राहुरी । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील एका गावात माणुसकीला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली. तीन अल्पवयीन बहिणींवर तिघाजणांनी सलग पाच वर्षे वेळोवेळी अत्याचार केला. यामध्ये एका महिलेने त्यांना मदत केल्याचे समोर आले आहे.

या घटनेतील पती-पत्नी काही वर्षापूर्वी विभक्त झाले. त्यावेळी त्यांना चार मुली होत्या. एका मुलीचे लग्न झाले होते. तीन मुलींना त्यांच्या वडिलांनी एका नातेवाईकाच्या स्वाधीन केले होते. नातेवाइकाने त्या तीन मुलींच्या मजबुरीचा फायदा घेऊन त्यांच्यावर २०२० पासून आजपर्यंत वेळोवेळी लैंगिक अत्याचार केले. यासाठी त्यांना एका महिलेने मदत केल्याचे समोर आले आहे. पीडित तीन मुलींपैकी एकीने ही बाब मोठ्या बहिणीला सांगितली. त्यानंतर मोठ्या बहिणीने आपल्या पीडित दहा, चौदा व सोळा वर्षीय बहिणींना बरोबर घेऊन १७ सप्टेंबरला राहुरी पोलिस ठाणे गाठले. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून कारवाई केली. पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव, हवालदार राहुल यादव, प्रमोद ढाकणे, नदीम शेख, सतीश कुऱ्हाडे, गणेश लिपने तसेच नायब तहसीलदार बाचकर आदींच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पीडित मुलींची सुटका केली.

मोठ्या बहिणीच्या फिर्यादीवरून बजरंग कारभारी साळुंखे, इतर दोघे व एक महिला अशा चारजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पथकाने आरोपी बजरंग कारभारी साळुंखे याला तत्काळ ताब्यात घेतले आहे. अन्य तीन आरोपींचा शोध पोलिस घेत आहेत.पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक राजू जाधव हे करीत आहेत.

# ऊसतोड कामगारांना कुक्कुटपालन किटचे वाटप

## हंगामी स्थलांतर थाबविण्यासाठी प्रयत्न, गेल्या १ वर्षाभरापासून ६३४ कुटुंबाचे स्थलांतर थाबविण्यात यश

जालना । प्रतिनिधी

उसतोडीला पर्यायी व्यवसाय म्हणून लघु उद्योगसाठी मदत कधी दुष्काळ कधी हाताला काम नाही या समस्या जालना जिल्हातील परतुर तालुक्यातील १५ गावे घनसावंगी तालुक्यातील १५ गावातील मंजुर दरवर्षी उसतोड साठी कर्नाटक सोलापुर सातारा बारामती इतर ठिकाणी उसतोडीसाठी आपल्या बालका सहीत जात आहेत.



यात त्याच्या आरोग्य पोषण व बालकाचे शिक्षण दुर्लक्ष होत होते यातच मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर याच्या वातीने उसतोड कामगार आरोग्य व पोषण खात्रीशीर सेवा प्रकल्प मध्यामातुन उसतोड कामगारासाठी पर्यायी उपजीविकेचे अनेक मार्ग आहेत त्यासाठी संस्थेच्यावतीने त्यांना पशु, शेळी, कोंबडी, किराणा स्टोअर्स वाटप करण्यात येते. स्वतःच्या शेतात फळबाग सुरू करणे, कैशल्य अधारित कामे उदा बांधकाम, इलेक्ट्रिक लघु उद्योग सुरूवात करणे या सारख्या पर्यायाचा समावेश आहे. तसेच त्यांना छोट्या मोठ्या व्यवसायासाठी मदत करून कौशल्य प्रशिक्षण संस्थेच्यावतीने देण्यात येते. यातच गाव पातळीवर उसतोड कामगार समिती व बाल संरक्षण समिती, संरपच याच्या मध्यामातुन लाभार्थी निवड ही गाव पातळीवर ठराव घेऊन निवड करण्यात येते. अशांना शेळी, पालन कुक्कुटपालन, किराणा दुकान साठी मदत केली जाते. ऊसतोड कामगारांनी गावात राहुन लघु व्यवसाय करावे व स्थलांतर थाबावे या हेतुने संस्थेच्यावतीने मदत करून नियमित प्रशिक्षण भेट घेण्यात येते. कुक्कुटपालन संदर्भात घ्यावयाची काळजी व व्यवस्थापन संबंधित प्रशिक्षण डॉ.अशोक टाकरस यानी दिले. यावेळी अप्पासाहेब उगले प्रकल्प संचालक, जिल्हा संपर्क अधिकारी भाऊसाहेब गुजाळ, अश्वजित जाधव प्रकल्प व्यवस्थापक जालना, अनुप मोरे, एकनाथ राउत जिल्हा समन्वयक जालना, कार्यक्रम यशस्वीतेसाठी अजय गाढे, राजेश वाघमारे, सुरेखा वाघमारे, योगेश आढे, आकाश चौगुले, महादेव खरात याची उपस्थिती होती.

# गटशिक्षणाधिकारी यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी

अंबड । प्रतिनिधी

अंबड पंचायत समिती येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करून त्यांचा पदभार तातडीने काढावा, अशी मागणी प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने केली आहे. यासंदर्भात त्यांनी जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना एक लेखी निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अंबड येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांनी शालेय गणवेश अनुदान वितरणात भ्रष्ट्राचार करण्याच्या हेतुने विलंब केला असून दुकानदारांकडून आणि मुख्याध्यापक यांच्याकडून कमिशन संकलन करण्यासाठी गणवेश वाटप टप्पा १ व टप्पा २ चे अनुदान दीर्घकाळपर्यंत वितरीत केले नाही. परिणामी तालुक्यातील विद्यार्थ्यांना गणवेश विलंबाने प्राप्त झाले आहेत. शालेय गणवेश अनुदान टप्पा २ वितरण करतांना ज्या मुख्याध्यापकाने किंवा दुकानदाराने गणवेश अनुदानासाठी कमिशन दिले त्यांचेच अनुदान वितरण केले गेले. ज्यांनी पैसे दिले नाही त्यांचे अनुदान जाणीवपुर्वक वितरीत केले नसल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. दरम्यान, गणवेश वितरण टप्पा २ चे अनुदान १४ जुलै रोजी पंस. स्तरावर प्राप्त झाला मात्र या अनुदानाचे वितरणात सप्टेंबर मध्ये झाले आहे विद्यार्थ्यांच्या शालेय गणवेशात भष्ट्राचार करणाऱ्या या प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांची चौकशी करण्यात यावी.

# दुमजली घरात अवैध कत्तलखाना; एकास अटक, दोघे पसार

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शहरातील झेंडीगेट भागतील सुभेदार गल्ली येथील एका दुमजली घरामध्ये सुरू असलेल्या कत्तलखान्यावर पोलिसांनी छापा टाकला. एका आरोपीस रंगेहाथ पकडला असून, दोन जण पसार झाले आहेत.

महानगरपालिका व पोलिसांनी संयुक्त मोहीम राबवून झेंडीगेट परिसरातील सात कत्तलखाने उद्ध्वस्त केले. या परिसरात गोवंशीय जनावरांचा घरामध्ये कत्तलखाना सुरू केला असल्याची माहिती कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश देशमुख, अंमलदार संतोष बनकर, व्ही. आर. पठाण, बाळकृष्ण दौंड, विनोद बोरगे, अविनाश वाकचौरे, विजय ठोंबरे, राम हंडाळ, सोमनाथ केकाण, प्रतिभा नागरे यांच्या पथकाने सुभेदार गल्लीत छापा टाकला. समीर अकील शेख (वय २०, रा. गांधीनगर, बोल्हेगाव) याला पकडण्यात आले. नसीर कुरेशी (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही), अप्पू ऊर्फ अफ्रोज कुरेशी (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) हे दोघे अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले आहेत. तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या छाप्यामध्ये सुमारे २१२ किलो गोमांस, लोखंडी कुऱ्हाड, सुरी अशा हत्यारांसह एकूण ४२ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४१४
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २१/०७/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) संजय किसन जाधव सर्व्हे नं.-८० सहन प्लॉट नं. ४२ नं.प.मि.नं.१८-१२२-४२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१२२-४२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- पुर्व प्लॉट नं. ४१
पश्चिम : पुर्व प्लॉट नं. ४३
दक्षिण- याच सर्व्हे नं. मधील भाग
उत्तरः १५ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५५३
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १६/०९/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) अनिता अंकुश उदघाले न.भु.खंड क्र .१८६९/अ/५२ चे वारसाने हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- १८ मिटर रुंदीचा रोड
पश्चिम : सर्व्हे नं.
दक्षिण- प्लॉट नं. ५३
उत्तरः यांचा प्लॉट बाबासाहेब दत्तु पवार व विठ्ठल वाघमारे खरेदी केलाला हिस्सा

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# नुकसानीची माहिती प्रशासनाला द्या; खचून जाऊ नका - आ.मोनिका राजळ

शेवगाव । प्रतिनिधी

महापूरामुळे झालेल्या मालमत्तेचे व शेतीच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ अहवाल सादर करून नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू. या नैसर्गिक संकटाचा सामना सरकार, प्रशासन व नागरिक यांच्या समन्वयाने अधिक व्यवस्थितपणे करता येईल. नागरिकांनी खचून न जाता झालेल्या नुकसानीची माहिती प्रशासनाला द्यावी, अशा शब्दात आमदार मोनिका राजळे यांनी पूरग्रस्तांना धीर दिला.



शेवगाव तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या भागाची आमदार मोनिका राजळे यांनी रविवार (ता.२१) पाहणी केली. यावेळी त्या नागरिकांशी संवाद साधताना बोलत होत्या. यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार आकाक्ष दहाडदे, कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, सचिन भाकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रल्हाद पाठक, पाटबंधारे विभागाचे पाटील, महेश फलके, बापूसाहेब पाटेकर, उमेश भालसिंग, गणेश रांधवणे, भीमराज सागडे, सुनील होडशीळ आदी गावातील नागरिक उपस्थित होते. तालुक्यातील वरुर बुद्रुक व खुर्द, भगूर, खामगाव जुने, जोहरापूर, वडुले बुद्रुक, लोळेगाव, सामनगाव, मळेगाव-शे, आखतवाडे, आपेगाव, ढोरजळगाव, मलकापूर, ढोरजळगाव, निंबेनांदूर, वाघोली, वडुले खुर्द, आव्हाणे बुद्रुक व खुर्द व अमरापूर आदी गावातील ढोरा, नांदणी, सकुळा आदी नद्यांना आलेल्या महापुरामुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांच्या बांधावर जावून समक्ष पाहणी केली. यावेळी उपस्थित असलेल्या शेतकरी व ग्रामस्थांनी आमदार राजळे यांच्या समोर समस्यांचा पाढा वाचून दाखवला. मोठा खर्च करून घेतलेली पिके, उभारलेला संसार, नैसर्गिक संकटांनी क्षणार्थात होत्याचे नव्हते झाले. पाहणी दरम्यान महसूल विभाग, कृषी विभाग, महावितरण, लघुपाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पशुसंवर्धन विभाग, जलसंधारण विभाग, पाटबंधारे विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

# वरुणराजाचा प्रकोप, सिंदफणामाईचा रुद्रावतार

## नदीकाठाच्या शेतीचे प्रचंड नुकसान; हजारो हेक्टर पिके वाहून गेली

**शिरूर । शंकर भालेकर**

**आष्टीसह, पाटोदा,शिरूर,पाथर्डी तालुक्यात पुन्हा एकदा वरुणराजाचा प्रकोप झाल्याने सिंदफणा नदीने गेल्या अनेक दशकानंतर रुद्रावतार धारण केल्याचे सोमवारी पाहायला मिळाले. रविवारी रात्रभर झालेल्या अतिवृष्टीमुळे सिंदफणानदीसह उपनद्याला मोठा पूर आलाने नदी लगतच्या शेतीला मोठा फटका बसला आहे. हजारो हेक्टर कापूस, उडीद, सोयाबीन, बाजरी, ऊस आदी पिके वाहून जाऊन जमीनदोस्त झाली आहेत. अनेक गावांचा जन संपर्क ही तुटला असल्याचे चित्र अनेक वर्षा नंतर शिरूर तालुक्यात पहिल्यादाच पाहायला मिळाले आहेत.**

काही दिवसांच्या विश्रांतीनंतर शनिवार दि. १३ सप्टेंबर पासून जिल्ह्यामध्ये वरून राजा सक्रिय झाला असून, जिल्ह्यामध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने अतिवृष्टीची नोंद झाली आहे. गेल्या आठ-दहा दिवसापासून शिरूर तालुक्यातही सातत्यपूर्ण पाऊस पडत असल्याने शेतातील उभे पिके शेतीत पाणी साचल्यामुळे सडू लागली आहेत. कापसाची झालेली मोठमोठाली बोंडे पावसामुळे सडू लागली आहेत. गेल्या सोमवारी सिंदफणा नदीला पूर आला होता यातच अनेक शेतकऱ्यांची पिके ही पाण्याखाली गेली होती. तर अतिवृष्टीमुळे उभे पिके ही सडू लागल्याने प्रशासनाकडून पंचनामे सुरूही करण्यात आले होते. त्यातच पुन्हा रविवार दि. २१ सप्टेंबर रोजी आष्टी पाटोदा शिरूर आणि पाथर्डी रात्रभर अतिवृष्टी झाल्याने सिंदफणा नदीने आपली हद्द सोडली आहे. तर तालुक्यातील किना,उथळा, कापरी आदी उपनद्यासह महापूर आल्याचे सोमवारी पाहायला मिळाले आहे. सुदैवाने कुठल्याही जीवितहानीची नोंद झाली नसली तर तालुक्यातील अतिवृष्टीमुळे व नदीच्या महापुरामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतामध्ये राब राब राबून बहरात आणलेली पिके वरून राजाच्या प्रकोपामुळे जमीन दोस्त झाली आहेत. ◀◀ पान २ वर





### फोन सेवेसह विद्युत वितरणाचा खोळंबा

सकाळपासूनच पूर जन्य परिस्थिती निर्माण झाल्याने विद्युत वितरण कंपनीने विद्युत पुरवठा खंडित केला आहे. यामुळे सोमवारी विद्युत पुरवठा अभावे मोबाईल सेवेचे टॉवर्स गत प्राण झाले आहे यामुळे दैनंदिन जीवनाला मोठा फटका बसला आहे तर नेट करी दिवसभर हिरमुसल्या चेहऱ्याने मोबाईल कडे पाहून नेटवर्क मिळत नसल्यामुळे मनस्ताप करीत आहेत.

### रात्रीचा प्रवास करणे टाळा

शिरूर कासार तालुक्यातील सर्व नागरिक बंधू-भगिनींना आवाहन करण्यात येते की, अजूनही पाऊस पडण्याची शक्यता आहे. मागील कालावधीत पडलेल्या पावसामुळे जमिनीची जलधारण शक्ती संपलेली आहे. परिणामी पडणाऱ्या पावसाचे रूपांतर केवळ पुरात होणार आहे. तसेच ओढे आणि नद्या यांचा प्रवाह मोकळा झाल्यामुळे पुराचा वेगही जास्त असणार आहे. अनेक ठिकाणी पूल खरडून/ खचून गेले आहेत. ही परिस्थिती विचारात घेता नदीकाठच्या/तलावा जवळील ग्रामस्थांनी विशेष सतर्कता बाळगावी. तसेच रात्रीच्या वेळी प्रवास टाळावा. ज्या ठिकाणी पुलावरून पाणी वाहत आहे, अशा ठिकाणी पूल ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. आपली गुरेढोरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. आपण स्वतः व आपल्या कुटुंबीयांची काळजी घ्यावी.

सुरेश घोळवे,तहसीलदार शिरूर कासार



शिरापूर गात येथील महिला व तिचे चार महिन्याचे लहान बाळ यांना सुखरूप पणे बाहेर काढण्यात आलेले आहे

### दक्षिण- उत्तर तीरावरील गावांचा तालुक्यात संपर्क तुटला

गेल्या अनेक वर्षानंतर पहिल्यांदाच सिंदफणा नदीने रुद्रावतार धारण केल्यामुळे सिंदफणा नदीच्या दक्षिण- उत्तर तिरांना जोडणारे तालुक्यातील सर्व पुलावर सुमारे १५ ते २० फुट उंचीचे पाणी वाहत असल्यामुळे दक्षिण -उत्तर तीरावरील गावांचा सोमवारी परस्पर संपर्क तुटल्यामुळे अनेक कामाचा खोळंबा झाला आहे.

# आ.संदीप क्षीरसागर नागरिकांना वाचविण्यासाठी सरसावले

## अजित पवारांना संपर्क करून आपत्ती व्यवस्थापनाकडून मदत उपलब्ध केली

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह तालुक्यात अतिवृत्ती झाल्याने आपत्तीजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. या अतिवृष्टीमुळे बीड मतदार संघात अनेक ठिकाणी पूरजन्य परिस्थिती झाल्याने नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या पूरजन्य ठिकाणी बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर हे नागरिकांच्या मदतीसाठी सरसावले आहेत.



बीड शहरातील इस्लामपुरा अतिवृष्टीमुळे रस्ता वाहून गेला होता. त्याभागातील शाळकरी मुलांना शाळेत जाण्यासाठी अडचण येत होती. त्या भागातील नागरिकांच्या समस्या दूर करण्यासाठी घटनास्थळी उभे राहून बीड नगरपालिकेच्या यंत्रणेकडून प्रत्यक्षात काम करून घेतले. बीड मतदार संघातील साक्षाळपिंपरी येथील सिंदफणा ◀◀ पान २ वर

### घटनास्थळावरून उपमुख्यमंत्री अजित पवारांना तातडीने केला संपर्क

या सर्व परिस्थितीची गंभीरता पाहून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना संदीप क्षीरसागर यांनी तातडीने संपर्क करून परिस्थितीबद्दल माहिती देत आपत्ती व्यवस्थापनाकडून मदत देण्याची विनंती केली. अजित दादांनी पण परिस्थितीचे गांभीर्य समजून बीडच्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना आदेश देऊन व्यवस्थापनाची टीम उपलब्ध करून दिली.

# बेलगाव परिसरात अतिवृष्टीने पिकांचे अतोनात नुकसान

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील दौलावडगाव, धामणगाव,आष्टी महसुल मंडळात पुन्हा काल रविवारी रात्री अतिवृष्टी वा संततधार पाऊस झाल्याने नद्या नाल्यांना पूर आला. कडा येथील कडी नदीच्या पुलावरुन पुन्हा पाणी वाहिल्याने तीन तास वाहतुक बंद झाली होती.दरम्यान बेलगाव येथील बोकडी नदीला पूर आल्याने बेलगाव परिसरात अतिवृष्टीने पिकांचे अतोनात नुकसान झाले.



पुराने जमीनी वाहुन तर गेल्याच ऊस, सोयाबीन,कांदा जमीनदोस्त झाले आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे. शासनाने तात्काळ पीक पंचनामे करुन नुकसानबाबत आर्थिक मदत द्यावी अशी मागणी होत आहे.

# माजलगाव धरणातून सिंदफना नदीपात्रात ८८ हजार ५९४.७७ क्युसेक्सने विसर्ग

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगांव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दि २१ सप्टेंबर च्या मध्यरात्री अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने धरणात येणारी पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात असल्याने धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने माजलगाव धरणातुन दि २२ सप्टेंबर सोमवार रोजी सकाळी ८:०० वाजण्याच्या सुमारास धरणातुन द्वार क्रमांक ११,६,१६,१० व १२, हे ०.५० मिटर व सांडव्याचे वक्रद्वार क्रं११,६,१६,१० व १२ हे २:५० मिटरने आणी,९,१३,८,१४,७,१५ हे २ मिटरने उघडण्यात आले आहे.यामधून सिंदफणा नदीपात्रात ८८ हाजार ५९४.७७ क्युसेसने इतके पाणी सोडण्यात आले.त्यामुळे माजलगाव तालुक्यातील ३२ गावांना पुन्हा एकदा पुर परीस्थीतीचा धोका निर्माण झाला असुन सिंधफाना नदीवरील जुना पुल पाण्याखाली आहे.



सिंधफना नदीवरील जुना पुल पाण्याखाली

माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने त्यामुळे पाणलोट क्षेत्रातील कुंडलीका व सिंदफाना नदी-नाल्यामधुन ◀◀ पान २ वर

# चिंचाळा-शेकापूर- देसुर-बीडसांगवी परिसरात अतिवृष्टीचा तडाखा - शेती पाण्याखाली, पिकांचे मोठे नुकसान

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे चिंचाळा, शेकापूर, बेलगाव,देसुर, बीडसांगवी परिसरात नद्या व नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. या पुराच्या पाण्यामुळे नदीलगतच्या तसेच नाल्यालगतच्या शेतीत मोठ्या प्रमाणात पाणी शिरले असून शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान झाले आहे.

पूराच्या पाण्यात कांदा, सोयाबीन, तूर, मका या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. काही भागात शेतीतील मातीही वाहून गेल्याने भविष्यात पिकांची पेरणी करणे कठीण होणार असल्याची भीती व्यक्त होत आहे. शेतकरी वर्गासमोर हाती आलेले पीक वाया जाण्याबरोबरच पुढील हंगामासाठी जमिनीची सुपीकता टिकवणे ही मोठी समस्या उभी राहिली आहे. सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे हाल होत असून शासनाने तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकरी करत आहेत.या पुरस्थितीमुळे चिंचाळा, शेकापूर, बेलगाव,देसुर व बीडसांगवी परिसरातील रस्त्यावरील वाहतूकही ठप्प झाली आहे. काही गावांचा संपर्क तुटला असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे शेतकरी वर्गावर आलेल्या या संकटाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन मदतकार्य सुरू करावे, अशी सर्वांचीच मागणी आहे.




# सिंदफणा नदीने दिड किलोमीटर पात्र सोडले

### हाजीपुर, धांरवंटा, उक्कडपिंप्री, सिरस मार्ग परिसरातील हजारो हेक्टर जमीन खरडली, पिकांचे अतोनात नुकसान

गेवराई । प्रतिनिधी

रविवारी रात्री व सोमवारी पहाटे, शिरुर कासार परिसरात ढगपुटीमुळे सिंदफणा नदीने काठापासुन एक ते दिड किलोमीटर पर्यंत पात्र सोडल्याने, शिरुर कासार व गेवराई तालुक्यातील नदी काठच्या शेत जमिनी खरडून शेतकर्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, शेत वस्ती राहणाऱ्या शेतकर्याने प्रसंग सावधान बाळगल्याने जीवत व जनावराची जिवीत हानी झाली नाही, सिंदफणा नदी लागत असणारे हाजीपुर, गाजीपुर, धांरवंटा उक्कडपिंप्री, सिरस मार्ग सह अनेक गांवातील हाजारो हेक्टर खरडून गेल्याने, मोसंबी, उस, कापूस, सोयाबीन, तुर, अशी खरीप हंगामातील पिकाचे मोठे नुकसान झाले, असुन शासनाने तात्काळ मदत करावी अशी आशा शेतकरी वर्ग करत आहे,



गेली पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळा पासुन आशा पाऊस ◀◀ पान २ वर

# नांदूर हवेली गावाला पाण्याचा वेढा

## दिंडी वस्तीवर वीस लोक अडकले, चिंतेचे वातावरण

बीड । प्रतिनिधी

बीड : गेवराई मतदारसंघात असलेल्या नांदूर हवली व खामगावला पाण्याचा वेढा पडल्याने, जवळच असलेल्या दिंडे वस्तीवरची दहा बारा माणसे अडकली आहेत. एकजण झाडावर चढून बसल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला असून, बीड जिल्ह्यात चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, बीड जिल्हा प्रशासन घटनास्थळी दाखल झाले आहे. विद्यमान आमदार विजय राजे पंडित, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके व एनडीआरएफ ची एक टीम , नगर परिषद गेवराई चे कर्मचारी गावात ठाण मांडून आहेत. गेवराई चे युवा नेते बाळराजे पवार हे सुद्धा नांदूर हवेली गावाच्या नव्या वस्तीवर ठाण मांडून आहेत. तहसीलदार शेळके यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून, माहिती घेतली. दरम्यान, गावाला सुरक्षित बाहेर काढा, अशी मागणी होऊ लागली असून ; वस्तीवर अडकलेले लोक जीव मुठीत धरून बसलेत. त्यांना कसे बाहेर काढायचे, असा प्रश्न पडला आहे. तहसीलदार शेळके यांनी सदरील परिस्थितीची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली आहे. दरम्यान, सोमवार ता. २२ रोजी सायंकाळपर्यंत गाव आणि वस्तीवर अडकलेल्या नागरीकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, रात्र झाल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

# गेवराई शहराला पाण्याचा वेढा

## गेवराई-शेवगाव राज्य रस्ता बंद, अनेक गावांचा संपर्क तुटला









गेवराई । प्रतिनिधी

बीड - गेवराई तालुक्यातील विविध भागाला, सोमवारी पून्हा मुसळधार पावसाने अक्षरश झोडपून काढले असून, शहराला पाण्याचा वेढा पडला आहे. शहराच्या पश्चिम, उत्तर, दक्षिण भागाकडच्या गावातील नागरीकांचे रस्ते पाण्यात गेले आहेत. त्यामुळे, संपर्क तुटला आहे. काही शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, उच्चभ्रू वस्ती असलेला श्री दत्त पार्क एका बाजुने पाण्याने वेढल्याने चिंता व्यक्त केली जात असून, कुठलीही अप्रिय घटना घडू नये, गेवराई तहसील व नगर परिषदेच्या प्रशासनाने घटनास्थळी कर्मचाऱ्यांचा पहारा ठेवला आहे.रविवार ता. २१ च्या रात्री पासून कोसळधार सुरू झाली. रात्री अकरा वाजता पावसाला सुरुवात झाली. कधी जोरात तर कधी संततधार पाऊस सुरू होता. सोमवारी पहाटे पावसाने उसंत घेतली. गेवराई शहर व तालुक्यातील विविध भागात मुसळधार पाऊस झाला असून, जवळपास ९० मिमी पाऊस झाल्याचा अंदाज आहे. गेवराई, चकलांबा, उमापूर परिसराला पावसाने झोडपून काढल्याने, नदी नाल्यांना पूर आला. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. नागरिकांच्या घरात पाणी गेल्याने, नुकसान झाले आहे. गेवराई शहरातील दत्त पार्कला पाण्याचा वेढा पडला. गेवराई शहरातून दत्त पार्क कडे जाण्यासाठी एक पूल बांधण्यात आलेला आहे. तो पूल पाण्यात गेल्याने संपर्क तुटला आहे. गेवराई-औरंगाबाद राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या जमादानीच्या पुलाला पाणी लागले आहे. सोमवारी दिवसभर पाऊस झाल्यास, राष्ट्रीय महामार्गावर ◀◀ पान २ वर

# पाटोदा शहराला पुराचा तडाखा ॲड.पठाण धावले लोकांच्या मदतीला

पाटोदा प्रतिनिधी...

पाटोदा तालुक्यात दिनांक २१ रोजी रात्री बारा ते सकाळी सहा वाजेपर्यंत सुरू होता अति भयान पावसात ॲड जब्बार पठाण व त्यांच्या टीमने रात्रभर जागून दोन ते सहा वेळेत रात्रभर मदत कार्य सुरू ठेवले लोकांना पूर परिस्थितीतून बाहेर काढून सुरक्षित थळी हलवण्याचे काम त्यांनी केले. मांजरा नदीकाठच्या पूरग्रस्तांना पाठवला नगरपंचायत आणि रेस्ट हाऊस येथे राहण्याची सोय करून दिली पाटोदा शहरात नदीसह वड्यावर नाल्यावर मांजरा नदीकाठी अतिक्रमण वाढल्याने ◀◀ पान २ वर



# पिंपळवंडी नदीवर कमानीचा उंच पूल उभारा

## पुलावरून पाणी वाहताना ग्रामस्थांना करावा लागतो जीवघेणा प्रवास

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी गाव व बस स्टॅन्ड परिसराच्या लोकवस्ती मधून गावाला वळसा मारून नदी आहे.या नदीवर सिमेंटच्या नळ्यांचा खूप जुना पूल असून हा खूपच कमी उंचीचा असल्याने या नदीला प्रत्येक वर्षी होणाऱ्या पावसाळ्यात महापुर आला तर या पुलावरून ५ ते ६ फुट उंच पाणी वाहते.यामुळे पुलावरील पाणी ओसरेपर्यंत ग्रामस्थांचा गावात जा-ये करण्याचा ६ तासाच्यावर पाणी ओसरेपर्यंत संपर्क तुटून मोठी गैरसोय होते.ग्रामस्थांची होणारी ◀◀ पान २ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शिरूरमध्ये जमिनीच्या वादातून कुटुंबावर जीवघेणा हल्ला; १४ जणांसह अनोळखी ७ आरोपींवर गुन्हा दाखल

## मोटरसायकल पार्क करण्यावरून लाथा बुक्क्यांनी मारहाण; तीन जणांवर गुन्हा दाखल

**शिरूर । प्रतिनिधी**

कवठे येमाई (ता. शिरूर) येथील हिलाळवस्तीमध्ये जमिनीच्या वादातून मुलमुले कुटुंबावर दहशतीचा हल्ला झाला. लोखंडी रॉड, फावडे व लाकडी काठ्यांनी बेदम मारहाण करून शिवीगाळ व जीव मारण्याच्या धमक्या दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा १४ जणांसह इतर सात अनोळखी आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



हरिदास देविदास मुलमुले (वय ४५, धंदा शेती, रा. हिलाळमळा, कवठे येमाई, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. रविवारी (दि. २१) सकाळी साडेसहाच्या सुमारास फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय घरासमोर असताना आरोपींनी एकत्रितपणे हल्ला केला. जमिनीच्या गट नंबर १६३१/१ च्या वादावरून आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून शिवीगाळ, धमक्या देत कुटुंबातील सर्व सदस्यांना मारहाण केली. फिर्यादींना समीर शिंदे व मंगल शिंदे यांनी लाथाबुक्क्यांसह काठीने मारहाण केली. वडील देविदास यदु मुलमुले यांना दत्तात्रय शिंदे व संदिप शिंदे यांनी लोखंडी रॉडने डोक्यावर व छातीवर वार केला. मुलगा सूरज, पुतण्या संग्राम, पत्नी संगिता तसेच भाऊ संतोष, वहिनी प्रमिला यांनाही आरोपींनी गंभीर मारहाण केली. महिलांना केस धरून ओढणे, जमिनीवर पाडणे व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा गंभीर आरोप फिर्यादींनी केला आहे.

याप्रकरणी समीर देवराम शिंदे, संदिप दत्तात्रय शिंदे, दत्तात्रय विठोबा शिंदे, विनायक विठोबा शिंदे, देवराम विठोबा शिंदे, धुरपाबाई देवराम शिंदे, शोभा विनायक शिंदे, सुशिला दत्तात्रय शिंदे यांच्यासह सोनाली, मनिषा, पुनम, मनिषा समीर, बाई, मंगल शिंदे व सात अनोळखी आरोपींवर गुन्हा दाखल आहे. जखमींना शिरूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करून वैद्यकीय उपचार करण्यात आले. तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अनिल आगलावे हे करत आहेत.

गावात ही घटना मोठ्या प्रमाणावर चर्चेचा विषय ठरली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जमिनीच्या वादातून वाढणाऱ्या हिंसक घटना थांबाव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज व रामशास्त्री प्रभुणे यांचे पुतळे शिवाजीनगर न्यायालयात बसवावेत'; ॲड. बाळासाहेब खोपडे यांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांनी आदर्श न्यायव्यवस्था निर्माण केली होती. आजची न्यायव्यवस्थाही बरीचशी महाराजांच्या न्यायव्यवस्थेवर अधारित आहे. तर चुकीला चुक म्हणणारे आणि पेशव्यांना मृत्यूदंडाची शिक्षा देण्यास मागेपुढे न पाहणाऱ्या मराठी साम्राज्याचे प्रमुख न्यायाधीश (पंतन्यायाधीश) रामशास्त्री प्रभुणे या दोघांची जन्म व कर्मभूमी पुणे जिल्हा आहे.



त्यामुळे दोघांचा पुतळा शिवाजीनर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात बसवावा, अशी मागणी माजी अतिरिक्त जिल्हा सरकारी अभियोक्ता, पुणे आणि महाराष्ट्र राज्य सरकारी अभियोक्ता संघटनेचे माजी महा सचिव ड. बाळासाहेब खोपडे यांनी केली आहे. त्यांनी या मागणीचे निवेदन प्रमुख पुणे जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्याकडे दिले आहे.

शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली होती. त्यामध्ये न्यायाधीश पदाचा अंतर्भाव केला होता. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन निपक्षपाती न्यायदानाची काम होत असे. गाव पातळीवरही आदर्श न्यायव्यवस्था होती. पाश्चिमात्य इतिहासकार म्हणतात की, महाराजांची शासनव्यवस्था ही न्याय व समानतेच्या न्यायदानावर अधारीत होती. न्यायदान कसे असावे, याचा आदर्श महाराजांनी निर्माण केला आहे. तो आदर्श आपल्या न्याययंत्रणेसमोर असावा, म्हणून न्यायालयात महाराजाचा पुतळा बसविणे आवश्यक आहे. तसेच, ब्रिटीशांच्या नोंदीनुसार पेशव्यांना पुजाआर्चापेक्षा राज्यकारभारात लक्ष घालावे, असे ठासुन सांगणारे, खुद्द पेशव्याला मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यास मागेपुढे न पाहणाऱ्या रामशास्त्री प्रभुणे यांनीही न्यायव्यवस्थेत एक आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळे या दोघांचे पुतळे शिवाजीनगर न्यायालयात बसवावेत अथवा बसविण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी ड. बाळासाहेब खोपडे यांनी केली आहे.

# पुणे पोलिसांची मोठी कारवाई, एकामागे एक ४३ सराईत गुंडांना तुरुंगात डांबलं

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील गुन्हेगारी टोळ्यांच्या वाढत्या दहशतीला आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी (झींपश झेश्रळलश) मोठी धडक कारवाई केली आहे. विशेष म्हणजे, पोलिसांच्या परिमंडळ १ अंतर्गत एका दिवसात तब्बल ४३ गुन्हेगारांना अटक करून तुरुंगात पाठवण्यात आले आहे. या मोहिमेचा उद्देश नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचा असून, या कारवाईमुळे शहरात चांगलीच खळबळ उडाली आहे.



गेल्या काही आठवड्यांपासून पुण्यातील गुंडांच्या टोळ्यांमध्ये पुन्हा एकदा हालचाली वाढल्या असून, गोळीबार, वाहन तोडफोड, हल्ले यांसारख्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषतः नानापेठ भागात झालेल्या कोमकर-आंदेकर गँगच्या गोळीबारामुळे पुणे शहर हादरले होते. या घटनेनंतर पोलिसांनी गुन्हेगारी टोळ्यांविरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली होती. परिमंडळ १ चे उपायुक्त कृषिकेश रावले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही मोठी कारवाई केली. या पथकाने मात्र २४ तासांत ४३ सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी अनेकजण हे शहरातील कुख्यात आंदेकर गँगचे सदस्य असून, काहींवर खून, हत्या प्रयास (कलम ३०७), दारूबंदी कायदा, शस्त्रबंदी कायदा आणि गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. नवरात्रीच्या काळात कोणतीही हिंसक घटना घडू नये, यासाठी पोलीस ॲक्शन मोडवर आले आहे. शहरातील गुन्हेगारीचा आलेख रोखण्यासाठी, विशेषतः टोळयांचे नेटवर्क मोडून काढण्यासाठी पुणे पोलिसांची ही मोहीम आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्या टोळीने भर रस्त्यात प्रकाश धुमाळ यांच्यावर गोळीबार केला. फक्त गाडीला साईड न दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेला हा हल्ला इतका गंभीर होता की शहरात एकच खळबळ उडाली. यानंतर या टोळक्याने वैभव साठे या नागरिकावरही कोयत्याने हल्ला केला. सागर कॉलनी परिसरात उभ्या असलेल्या वैभव यांच्यावर आम्ही इथले भाई आहोत म्हणत टोळीतील गुंडांनी दहशतीचा इशारा देत हल्ला केला. या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला होता. यानंतर पोलिसांकडून टोळ्यांवर कारवाई केली जात आहे.

# पुण्यातील मराठमोळ्या शास्त्रज्ञाला मानाचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार, २२ लाखांचं घसघशीत बक्षीस

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील मराठमोळ्या शास्त्रज्ञ डॉ. हिमांशु कुलकर्णी यांनी अभिमानास्पद यश मिळवत आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नाव उंचावले आहे. भारतीय उपखंडातून प्रथमच एका संशोधकाला 'इंटरनॅशनल वॉटर प्राईझ' या मानाच्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ ओक्लाहोमा येथील थरढएठ सेंटरकडून २००९ पासून हा द्विवार्षिक पुरस्कार दिला जातो. पाणीपुरवठा आणि स्वच्छता या क्षेत्रात विकसनशील देशांतील लोकांच्या जीवनमानात सुधारणा करणारे उल्लेखनीय योगदान देणाऱ्यांना या पुरस्काराने गौरविले जाते. या पुरस्कारात मानाची ट्रॉफी आणि तब्बल २५,००० अमेरिकी डॉलर (सुमारे २२ लाख रुपये) इतकं बक्षीस आहे.



डॉ. कुलकर्णी हे निती आयोगाच्या १२व्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यकारी गटाचे सह-अध्यक्ष राहिले आहेत. त्यांनी राष्ट्रीय भूजल नकाशा तयार करण्याच्या कार्यक्रमात मोलाची भूमिका बजावली आहे. ते संस्थेचे संस्थापक ट्रस्टी आणि सचिव आहेत. या संस्थेमार्फत ते भूजल व्यवस्थापनासाठी समुदाय आधारित भागीदारी या संकल्पनेला प्रोत्साहन देत आहेत. या यशाबद्दल बोलताना डॉ. कुलकर्णी म्हणाले, हा पुरस्कार अनेक सहकार्यांचा आणि भागीदारींचा सन्मान आहे. भूजल हे सामूहिक स्रोत म्हणून व्यवस्थापित करणे हेच भारतातील भूजल संकटावर उपाय शोधण्याचा खरा मार्ग आहे.

सध्या डॉ. कुलकर्णी हे शिव नादर इन्स्टिट्यूट ऑफ एमेन्स डिग्री युनिव्हर्सिटीमध्ये ग्रामीण व्यवस्थापनाचे प्रॅक्टिस प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत. तसेच आयआयटी मुंबई, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस आणि अशांक देसाई सेंटरमध्ये ते व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणूनही योगदान देतात.

युनिव्हर्सिटी ऑफ ओक्लाहोमा कडून दिला जाणारा इंटरनॅशनल वॉटर प्राईझ हा पुरस्कार संशोधन, अध्यापन किंवा सेवा कार्याच्या माध्यमातून जागतिक स्तरावर पाणीपुरवठा आणि स्वच्छता क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेल्या व्यक्तींना दिला जातो. विशेष म्हणजे या पुरस्काराचा केंद्रबिंदू विकसनशील देशांतील गरीब आणि उपेक्षित समाज आहे.

डॉ. कुलकर्णी यांचा हा सन्मान महाराष्ट्रसाठीच नव्हे तर संपूर्ण देशासाठी अभिमानाचा क्षण आहे. ग्रामीण भागातील भूजल व्यवस्थापन, त्यावरील धोरणात्मक अभ्यास आणि सामुदायिक सहभागातून निर्माण होणाऱ्या शाश्वत उपायांची जगभरात दखल घेतली जात आहे. त्यामुळे मराठमोळ्या संशोधकाचा हा आंतरराष्ट्रीय सन्मान भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# १० हजार महिलांसाठी चारचाकी प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ

**पुणे । प्रतिनिधी**

नऱ्हे, धायरी व वडगाव बुद्रुक परिसरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांसाठी भव्य चारचाकी प्रशिक्षण शिबिराचे उद्धाटन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत तब्बल १० हजार महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिलांच्या सबलीकरणासाठी आणि स्वावलंबनासाठी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबवण्यात आला आहे.



या कार्यक्रमाच्या उद्धाटनप्रसंगी खडकवासल्याचे आमदार भीमराव अण्णा तापकीर, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, मंडल सरचिटणीस शहाजी वांजळे, भाजप युवा मोर्चाचे सारंग नवले, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, सागर भूमकर, शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, संदिप चरवड, रमेश गायकवाड, सुहास पवार, गजानन सरनाईक, पृथ्वीराज परदेशी, प्रकाश चरवड, चंद्रकांत पवळे, केदार जाधव, संग्राम पवार, सुरेश कोळेकर, सुदाम कोळेकर, संजीवनी मुंदडा, साई यात्रा प्रतिष्ठानच्या पूनमताई चरवड, साई पवार, यश चरवड आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरामुळे महिलांना वाहन चालविण्याबरोबरच आत्मविश्वास, स्वावलंबन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे मत यावेळी आमदार तापकीर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला परिसरातील शेकडो महिला व नागरिक उपस्थित होते.

# आंदेकर टोळीवर संघटीतरीत्या खंडणी उकळल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

गणेश पेठ मच्छी मार्केट परिसरातील मासे व्यापाऱ्यांना धमकावून आणि दहशतीच्या जोरावर तब्बल १२ वर्षांपासून संघटीतरीत्या खंडणी उकळल्याप्रकरणी कुख्यात सुर्यकांत उर्फ बंडू आंदेकर व त्याच्या टोळीतील एकूण ११ जणांविरुद्ध फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये आंदेकरच्या घरातील एका महिलेसह इतर सदस्यांचाही समावेश आहे.



हा गुन्हा (गु.र.नं. १८२/२०२५) भारतीय दंड संहितेच्या कलम ३०८ (खंडणी), ३०८ (४) (जीवे मारण्याची धमकी देवून खंडणी घेणे), १११ (संघटीतरीत्या गुन्हे करणे) व ३ (५) (सामाईक उद्देश) या कलमांतर्गत २० सप्टेंबर २०२५ रोजी दाखल करण्यात आला.तक्रारीनुसार, आंदेकर टोळीने प्रोटेक्शन मनीच्या नावाखाली दरमहा मासे व्यापाऱ्यांकडून तब्बल २० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम उकळल्याचे समोर आले आहे. व्यापाऱ्यांना जागा मिळवून देणे व व्यवसायात सहकार्य करण्याचे आश्वासन देत टोळीने वर्षानुवर्षे धमकी व दहशतीच्या जोरावर हा गैरप्रकार सुरू ठेवला होता. परिणामी, अनेक मासे विक्रेते व व्यापारी कर्जबाजारी झाले होते, मात्र टोळीच्या दहशतीमुळे त्यांनी तक्रार देण्याचे धाडस केले नव्हते. मात्र, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली संघटीत गुन्हेगारीविरुद्ध सुरू असलेल्या आक्रमक मोहिमेमुळे नागरिकांमध्ये धाडस निर्माण झाले. याच पार्श्वभूमीवर एका व्यापाऱ्याने आंदेकर टोळीविरुद्ध धाडसाने तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) अजित जाधव, फरासखाना पोलीस करीत आहेत. पुणे पोलीसांनी स्पष्ट केले आहे की, शहरातील संघटीत गुन्हेगारी टोळ्यांचे समूळ उच्चाटन होईपर्यंत कठोर कारवाई सुरूच राहील.

# बेवारस अस्थींचे पूजन आणि विसर्जन ; राष्ट्रीय कला अकादमीचा अनोखा उपक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

हिंदू परंपरेनुसार मृत्यूनंतर अस्थी विसर्जन ही आत्म्याच्या शांतीची शेवटची पायरी मानली जाते. अपघात अथवा इतर कारणांनी रस्त्यावर मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या देहाची ओळख पटत नाही. अशा मृतदेहांना वारस नसल्याने त्यांचे जीवन बेवारस अवस्थेत संपते. अशा बेवारस आत्म्यांना सन्मानाने निरोप मिळावा, या हेतूने राष्ट्रीय कला अकादमीतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वपित्री अमावास्येनिमित्त बेवारस अस्थींचे विधिवत विसर्जन करण्यात आले. गीतेच्या पंधराव्या अध्यायाचे पठण, मंत्रोच्चारात अस्थी विसर्जन विधी पार पडला.




आरटीओजवळील होळकर संगम घाटावरील उपक्रमासाठी पालिकेच्या ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाचे विशेष सहकार्य मिळाले. यावेळी नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पराग ठाकूर, डॉ. मिलिंद भोई, विनायक घाटे, राजेंद्र बलकवडे, शिरीष मोहिते, नितीन पंडित, पियुष शहा, आशिष जराड, राजाभाऊ कदम, दिलीप काळोखे, लता राजगुरू, पालिका उपायुक्त माधव जगताप, सहाय्यक आयुक्त भास्कर महाडिक, आरोग्य निरीक्षक विक्रम सरवदे, मुकादम नागेश बाराथे, नागेश लांडगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन अकादमीचे मंदार रांजेकर, रोमा लांडे, अमर लांडे, सदाशिव कुंदेन, अतुल सोनवणे, सुनील सोनटक्के, सचिन देसाई, बाला शुक्ला, किरण फाळके, राजेश निकम, सुप्रिया दळवी, प्रिया भोंडवे, मनोज गवळी यांनी केले.सर्वपित्री अमावस्येला पूर्वजांचे आपण स्मरण करतो. बेवारस आत्म्यांनाही शांती लाभावी ही भावना मनात ठेवून राबवलेला हा उपक्रम म्हणजे खरी माणुसकी आहे.

धर्म-जात न पाहता अस्थींचे विधिवत पूजन आणि विसर्जन करणे यातून एकतेचा संदेश राष्ट्रीय कला अकादमीच्या उपक्रमातून समाजात जातो, असे मिसाळ म्हणाल्या.बेवारस मृतांना कोणी नसते, त्यामुळे त्यांचे शेवटचे संस्कार होणे कठीण होते. गेली १५ वर्षे आम्ही हा उपक्रम राबवतो आहोत. कोणताही धार्मिक अडसर न ठेवता केवळ माणुसकीच्या भावनेतून हा उपक्रम केला जातो, असे रांजेकर म्हणाले.

# नीलम गोऱ्हे यांच्या वाढदिवासानिमित्त खास उपक्रम; ५०० विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप

**नसरापूर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रवासाला गती मिळावी आणि गरजू मुला-मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी मदतीचा हात मिळावा, या उद्देशाने नसरापूर येथे मोफत सायकल वाटप समारंभ उत्साहात पार पडला.



विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. शिवसेना भोर, राजगड, मुळशी तालुका, भोर-राजगड शैक्षणिक, सामाजिक व क्रीडा प्रतिष्ठान, कुलदीप तात्या कोंडे युवा मंच तसेच सिंहगड प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तब्बल ५०० विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.

जिल्हाप्रमुख रमेशबापू कोंडे म्हणाले की, या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत नवी आशा निर्माण झाली आहे. शिक्षणासाठी झगडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान म्हणजेच या कार्याचे खरे यश आहे.

तर कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक कुलदीप तात्या कोंडे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थी हेच आपल्या देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या शिक्षणात अडथळे येऊ नयेत, त्यांचा प्रवास थांबू नये, म्हणूनच हा उपक्रम राबविण्यात आला. आज विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आमच्यासाठी सर्वात मोठे समाधान आहे. यापुढेही शिक्षणासाठी असे उपक्रम राबवण्याचा आमचा संकल्प आहे.

या समारंभाला माजी उपसभापती अमोल पांगारे, निलेश घारे, युवा नेते सचिन आण्णा बांदल, दीपक करंजावणे, भोर तालुका युवा सेनेचे अध्यक्ष स्वप्निल गाडे, प्रमोद शिळीमकर, योगेश मांगले, सूरज जगताप, विशाल खुटवड, गणेश धुमाळ, संतोष इंगुळकर, दत्तात्रय खुटवड यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, भोर-राजगड प्रतिष्ठानचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी दिशा मिळून त्यांच्या स्वप्नांना पंख मिळाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# विघ्नहर' चे ४० व्या गळीत हंगामाचे बॉयलर अग्नी प्रदीपन संपन्न

**जुन्नर । प्रतिनिधी**

श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या ४० व्या गळीत हंगामाला सोमवार, २२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता निवृत्तीनगर (ता. जुन्नर) येथे साध्या पद्धतीने सुरुवात झाली. कारखान्याचे संचालक सुरेशशेठ भिमाजी गडगे आणि त्यांच्या पत्नी अमृताताई गडगे यांच्या हस्ते बॉयलर अग्निप्रदीपनाचा समारंभ पार पडला. यंदाच्या हंगामासाठी सर्व मशिनरीची देखभाल आणि दुरुस्ती पूर्ण झाली असून, कारखाना ऊस गाळपासाठी पूर्णपणे तयार आहे, अशी माहिती चेअरमन सत्यशिल शेरकर यांनी दिली.



राज्य मंत्री समितीच्या बैठकीत २०२५-२६ च्या गळीत हंगामाची तारीख जाहीर झाल्यानंतर विघ्नहर कारखाना गाळपासाठी सज्ज झाला आहे. यंदा १३ लाख मेट्रिक टनांहून अधिक ऊस गाळपाचे नियोजन करण्यात आले आहे. मागील हंगामात शासकीय धोरणांमुळे कारखाना उशिरा सुरू झाला होता, तसेच आधुनिकीकरण आणि विस्तारीकरणाची कामे सुरू होती. आता ही कामे पूर्ण झाल्याने कारखान्याची दैनंदिन गाळप क्षमता ५,००० मेट्रिक टनांवरून ७,५०० मेट्रिक टनांवर गेली आहे. यामुळे यंदा प्रतिदिन ८,००० ते ८,५०० मेट्रिक टन ऊस गाळप होणार आहे. तसेच, ६५ केएलपीडी क्षमतेचा डिस्टीलरी प्रकल्प आणि को-जन प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार आहेत.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्याच्या ऊस विकास विभागाचे मार्गदर्शन, खते आणि इतर सुविधांचा लाभ घेऊन उत्पादन वाढवावे असे आवाहन शेरकर यांनी केले. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस गाळपासाठी देऊन कारखान्याला सहकार्य करावे, अशी विनंती त्यांनी केली.बॉयलर अग्निप्रदीपन समारंभाला चेअरमन सत्यशिल शेरकर, व्हाइस चेअरमन अशोक घोलप, सुमित्रा शेरकर, कार्यकारी संचालक भास्कर घुले, सर्व संचालक, अधिकारी, कामगार युनियन, सेवक पतसंस्था आणि सांस्कृतिक मंडळाचे पदाधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.